पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८३ ■ शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




## लाडकीच्या खात्यात एकत्रित जमा होणार ३ हजार

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. या योजनेतून लाभार्थी महिलांना दरमहिन्याला १५०० रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीतील प्रचारात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा मुद्दा गाजला. त्यानंतर आता राज्यातील २९ महापालिका निवडणुकीतही या योजनेवर सातत्याने महायुतीमधील नेत्यांकडून बोलले जात आहे.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी महिलांसाना दोन महिन्याचे हप्ते एकत्र मिळणार आहेत. नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता एकत्र येणार होता. परंतु फक्त १५०० रुपये लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा झाले. त्यामुळे त्यांची निराश झाली. आता दिलासादायक बातमी समोर आली आहे. महिलांच्या बँक खात्यावर एकत्र ३ हजार रुपये जमा होणार आहेत. याबाबतची घोषणा भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी केली आहे.

देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मिळणार.. मकर संक्रांतीची मोठी भेट ! १४ जानेवारी पूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे ३००० रुपये जमा होणार ! असे ट्वीट करत मंत्री गिरीश महाजन यांनी माहिती दिली आहे. याचसोबत एक पोस्टरदेखील शेअर केले आहे.

## मतदानाच्या दिवशी शासकीय सुटी जाहीर

प्रतिनिधी ९ जानेवारी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य शासनाने महापालिका निवडणुकीसाठीच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर आता राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना १५ जानेवारी रोजी सुट्टी जाहीर करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

याबाबत राज्य शासनाकडून एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे. सदर परिपत्रकानुसार १५ जानेवारी २०२६ रोजी म्हणजेच येत्या गुरुवारी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही सुट्टी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांसह २९ महानगरपालिका क्षेत्रांना लागू असेल अशी पण माहिती राज्य शासनाकडून यावेळी देण्यात आली आहे. या सुट्टीचा राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे. मतदारांना महापालिका निवडणुकीसाठी मतदान करता यावे या अनुषंगाने शासनाने हा निर्णय घेतला आहे. १५ जानेवारी रोजी मतदानासाठी जी सुट्टी देण्यात आली आहे ती सुट्टी या आदेश शासनाकडून जारी करण्यात आलेल्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये समाविष्ट नव्हती. दरम्यान मतदानाच्या दिवशी शेअर मार्केट सुद्धा बंद राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अद्याप रिझर्व बँक ऑफ इंडिया कडून या संदर्भातील माहिती देण्यात आलेली नाही पण मुंबई महापालिकाची निवडणूक पाहता रिझर्व बँक ऑफ इंडिया लवकरच तत्सम आदेश जारी करण्याची शक्यता आहे. दुसरीकडे खाजगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या १५ जानेवारी रोजी च्या सुट्टी बाबत अजून अधिकृत निर्णय झालेला नसल्याची पण माहिती समोर आली आहे.

# भाजपच्या वादळात दोन्ही शिवसेना गारद होणार !

## नेतेगिरीचा तोरा शिवसेनेच्या मुळावर; भाजपचा गेम प्लॅन यशस्वी !

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या राजकारणात सध्या मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे.

भाजपची सूक्ष्म नियोजनबद्ध रणनीती आणि शिवसेनेच्या दोन्ही गटांतील नेत्यांचा 'ओव्हर कॉन्फिडन्स' यामुळे यंदाच्या निवडणुकीत दोन्ही शिवसेना (एकनाथ शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गट) पूर्णपणे गारद होण्याची चिन्हे आहेत. अकोल्यातून शिवसेनेचे अस्तित्व धोक्यात येण्यास केवळ नेत्यांचा 'तोरा' आणि कार्यकर्त्यांशी तुटलेला संवाद कारणीभूत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

जर शिवसेनेच्या दोन्ही गटांनी वेळेत आपली रणनीती बदलली नाही आणि नेत्यांनी आपला अहंभाव सोडून कार्यकर्त्यांशी संवाद साधला नाही, तर अकोला महापालिकेत भगवा फडकवणे सोडाच, पण अस्तित्व टिकवणेही कठीण जाईल, हेच सध्याच्या चित्रावरून स्पष्ट होत आहे.

### राष्ट्रवादीशी युतीचा 'मास्टरस्ट्रोक'

भाजपची 'पन्ना प्रमुख' रणनीती आणि राष्ट्रवादीशी युतीचा 'मास्टरस्ट्रोक' च्या तयारीत आहे. दुसरीकडे, भाजपने अकोल्यात आपले वर्चस्व राखण्यासाठी अत्यंत शिस्तबद्ध पावले उचलली आहेत. बुथ लेव्हलचा कार्यकर्ता आणि 'पन्ना प्रमुख' यांच्या माध्यमातून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचे भाजपचे लक्ष्य आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने अकोल्यात राष्ट्रवादी काँग्रेससोबत छुपी युती करत दोन्ही शिवसेनेचा राजकीय 'गेम' करण्याची पूर्ण तयारी केली आहे. यामुळे शिवसेनेच्या पारंपरिक मतपेढीत खिंडार पडण्याची शक्यता आहे. भाजप आमदार रणधीर सावरकर, माजी महापौर विजय अग्रवाल आणि राष्ट्रवादी महानगर अध्यक्ष विजय देशमुख या तिघांच्या रणनितीने शिवसेना अकोल्यातून हद्दपार होण्याची चिन्हं आहेत.

### नेतेगिरीचा तोरा अधिक, काम 'शून्य'!

अकोल्यातील दोन्ही शिवसेनेच्या नेत्यांवर कट्टर शिवसैनिकांनीच आता नाराजीचा तोफ डागली आहे. मराठी आणि अमराठी नेत्यांच्या केवळ मिरवण्यामुळे ग्राऊंड लेव्हलवर पक्षाचे काम 'शून्य' असल्याची टीका होत आहे. 'राज्यात सत्ता असो वा नसो, अकोल्यात शिवसेनेचे नेते जमिनीवरच्या कार्यकर्त्यांपेक्षा स्वतःच्या प्रतिमेतच अधिक मश्गूल आहेत,' असा संताप शिवसैनिकांमधून व्यक्त होत आहे. याच 'नेतेगिरी'मुळे शिवसेनेचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या प्रभागांमध्येही पक्षाची पकड सैल झाली आहे.

### अकोल्यातून शिवसेना संपणार?

अकोला महापालिकेचा इतिहास पाहिला तर भाजपचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, यावेळी दोन्ही शिवसेना गटांना भाजपच्या 'वादळा'चा सामना करणे कठीण जाणार असल्याचे चित्र आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना सत्तेत भागीदार असली तरी स्थानिक पातळीवर भाजप त्यांना जागा सोडण्यास तयार नव्हती. तर दुसरीकडे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला सावरण्यासाठी सक्षम नेतृत्वाचा अभाव जाणवत आहे. भाजपच्या स्थानिक नेत्यांचा कार्यकर्त्यांशी असलेला थेट संपर्क ही त्यांची जमेची बाजू ठरत आहे, जी शिवसेनेच्या नेत्यांमध्ये हरवलेली दिसते. 'शिवसेना संपण्यास केवळ येथील नेतेगिरीच्या तोऱ्यात असणारे मराठी व अमराठी नेते जबाबदार असतील. जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्याला महत्त्व न दिल्याने आज पक्ष संकटात सापडला आहे.'

# राज्याच्या राजकारणात खळबळजनक खुलासा !

- अकोटमध्ये भाजप-एम आय एम युतीवर जिल्हाधिकाऱ्यांचे शिक्कामोर्तब
- जिल्हाधिकाऱ्यांनी 'अकोट शहर विकास मंचा'ला रीतसर दिली आता मान्यता






राजेश सोळंके ९ जानेवारी

**अकोट:** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एकच खळबळ उडाली आहे. अकोट नगरपालिकेत सत्तेसाठी चक्क 'एमआयएम' सोबत हातमिळवणी करणाऱ्या भाजपला आता अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडून अधिकृत 'कवच' मिळालं आहे. भाजपच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या अकोट शहर विकास मंच'ला जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांनी कायदेशीर मान्यता दिल्याचं पत्र समोर आल्याने राजकीय वर्तुळात भूकंप झाला आहे.

नेहमीच हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून एमआयएमवर तुटून पडणाऱ्या भाजपला अकोट नगरपालिकेत बहुमतासाठी ५ नगरसेवक असलेल्या एमआयएमचा आधार घ्यावा लागला. आश्चर्याची बाब म्हणजे, या 'अकोट शहर विकास मंचात' केवळ भाजप आणि एमआयएमच नाही, तर दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी आणि बच्चू कडूंची 'प्रहार' देखील सहभागी आहे. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या या मान्यता पत्रामुळे भाजपच्या दुटप्पी भूमिकेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जेव्हा ही युती जाहीर झाली, तेव्हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक आमदार प्रकाश भारसाकळे यांना 'शो-कॉज' नोटीस बजावली, तर एमआयएमने आपला पाठिंबा काढून घेतल्याचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना दिले. एकीकडे पाठिंबा काढल्याचं पत्र दिलं जात आहे. तर दुसरीकडे मात्र, नियम ५ च्या तरतुदीनुसार नमुना ४ मध्ये या गटाची अधिकृत नोंद करण्यात आली आहे. एमआयएमने पाठिंबा काढल्याचे पत्र देऊनही जिल्हाधिकाऱ्यांनी या मंचाला मान्यता दिली, याचा अर्थ असा की अद्याप तांत्रिकदृष्ट्या ही अनैसर्गिक युती अस्तित्वात आहे. एमआयएमच्या पत्रावर जिल्हाधिकाऱ्यांनी नेमकी काय कारवाई केली ? भाजपच्या स्थानिक नेत्यांनी वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली का ? असे अनेक तिखट प्रश्न आता उपस्थित होत आहेत. 'अकोटमधील या 'खिचडी' आघाडीने भाजपचा वैचारिक गोंधळ उघड केला आहे.

केवळ सत्तेच्या खुर्चीसाठी ओवेसींच्या पक्षाशी सोयरिक करणारी भाजप आता जनतेला काय उत्तर देणार ?' - हाच प्रश्न अकोटच्या गल्लीबोळात विचारला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या एका पत्रामुळे आता भाजप आणि एमआयएम या दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांची चांगलीच गोची झाली असून, अकोटच्या सत्तेचं हे 'रंगीत नाट्य' कोणत्या वळणावर थांबणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



## कुपवाडा चकमकीत नायक वैभव लहाने यांना वीरमरण

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** तालुक्यातील कपिलेश्वर येथील मूळ रहिवासी व अकोल्यातील कौलखेड येथे वास्तव्य असलेले नायक वैभव लहाने यांना ७ जानेवारी रोजी कुपवाडा येथे झालेल्या चकमकीत वीरमरण आले. त्यांचे पार्थिव आज ९ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता त्यांच्या मूळगावी कपिलेश्वर येथे येणार असून, त्यानंतर त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. यावेळी अनेक गणमान्य नागरिकांसह सैनिकही उपस्थित राहणार आहेत. देशाच्या सीमांचे रक्षण करताना अकोला जिल्ह्याचा वीर सुपुत्र नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांनी आपल्या प्राणांची आहुती देत सर्वोच्च बलिदान दिले. जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत ७ जानेवारी रोजी ते शहीद झाले. त्यांच्या शौर्याने आणि त्यागाने संपूर्ण जिल्हा शोकसागरात बुडाला आहे. नायक वैभव श्रीकृष्ण लहाने (२४) हे भारतीय सैन्याच्या १२ मराठा लाइट इन्फंट्री या प्रतिष्ठित युनिटमध्ये कार्यरत होते. शहीद वैभव लहाने यांचे मूळ गाव कपिलेश्वर (पो. वडद, ता. अकोला) असून सध्या त्यांचा मुक्काम श्री गजानन नगरी, कौलखेड येथे आहे. ते



दोन भावंडांपैकी एक होते. त्यांचे धाकटे बंधू राजू लहाने हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात देशसेवेत कार्यरत आहेत. एकाच कुटुंबातील दोन जवान देशासाठी सेवा देत असल्याने लहाने कुटुंबाचा देशाभिमान अधिकच अधोरेखित झाला आहे. शहीद जवानांचे पार्थिव ९ जानेवारी रोजी दुपारी १ वाजेपर्यंत कपिलेश्वर येथे पोहोचणार असून, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## ऑटोचालकाचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी ९ जानेवारी

**खामगाव:** तालसवाडा ते शिवनी रोडवर शेताच्या कडेला एका ऑटोचालकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन एमआयडीसी मलकापूर येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. मृतकाचे नाव अमोल भावुराव भवरे, ३५ रा. धरणगाव, ता. मलकापूर असे असून तो व्यवसायाने ऑटो चालक तसेच शेती करत होता. फिर्यादी विजय प्रभाकर भवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अमोल भवरे हा ०७ जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते ७.३० वाजेदरम्यान स्वतःचा ऑटो घेऊन शिवनी व भोळी शिवारातील शेत पाहण्यासाठी गेला होता.

# अकोला महापालिकेत वंचितची विकेट धोक्यात ?

## तिकीट वाटपावरून पक्षात मोठा गोंधळ; नेते 'भूमीगत' झाल्याने कार्यकर्त्यांत संताप

### चुकीचे तिकीट वाटपः निवडून येण्याची क्षमता असलेल्यांना डावलले!

### संवाद खुंटलाः स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांमधील संपर्क तुटला

### स्थानिक नेत्यांनी दिलेला खोटा रिपोर्ट पक्षाच्या अंगाशी येण्याची शक्यता

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** आगामी अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच, वंचित बहुजन आघाडीसाठी धोक्याची घंटा वाजू लागली आहे. 'इलेक्टिव्ह मेरिट' (निवडून येण्याची क्षमता) डावलून करण्यात आलेले तिकीट वाटप आणि स्थानिक नेत्यांची संशयास्पद भूमिका यामुळे अकोल्यात वंचितला मोठा झटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अकोला महापालिकेत सत्ता आणण्याचे मोठे आव्हान असताना, अंतर्गत गटबाजी आणि नियोजनाचा अभाव वंचित बहुजन आघाडीला महागात पडू शकतो. आता पक्षप्रमुख प्रकाश आंबेडकर या प्रकरणात हस्तक्षेप करून परिस्थिती सावरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नेते 'भूमीगत', कार्यकर्ते वाऱ्यावर

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या नेत्यांवर तिकीट वाटपाची आणि रणनीतीची जबाबदारी होती, ते नेते सध्या 'भूमीगत' झाले आहेत. तिकीट न मिळाल्याने नाराज झालेले इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्ते स्थानिक नेत्यांचा शोध घेत आहेत, मात्र नेते संपर्क क्षेत्राबाहेर असल्याने पक्षात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्त्यांचे मनोबल खचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रचाराकडे देखील वरिष्ठ नेत्यांचे दूर्लक्ष असल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न बाळगणारे नेते महापालिकेत मात्र भूमिगत का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### 'इलेक्टिव्ह मेरिट'कडे दुर्लक्ष?

अकोला हा वंचित बहुजन आघाडीचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, यावेळी उमेदवारी देताना सक्षम आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांऐवजी चुकीच्या व्यक्तींना पसंती देण्यात आल्याचा आरोप होत आहे. स्थानिक नेत्यांनी वरिष्ठांना जमिनीवरील वास्तवापेक्षा वेगळी आणि चुकीची माहिती दिल्याचे समजते. यामुळे निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष असून, याचा थेट परिणाम मतदानावर होण्याची चिन्हे आहेत. काही नेत्यांनी त्यांच्या मर्जीतील उमेदवारांना तिकिट दिल्याची माहिती असून त्याचा फटका वंचितला बसण्याची चिन्हं आहे.

### नागरिकांमध्ये 'वंचित'बद्दल निरुत्साह

वंचित बहुजन आघाडीने यावेळी महानगरपालिका निवडणूक पुरेशा गांभीर्याने घेतली नसल्याची चर्चा सर्वसामान्य अकोलेकरांमध्ये आहे. पक्षाची सुस्त यंत्रणा आणि ढिसाळ नियोजनामुळे नागरिकांचा कलही आता इतर पर्यायांकडे झुकू लागला आहे. 'जर पक्षच निवडणुकीबद्दल सिरिअस नसेल, तर आम्ही त्यांच्याबद्दल सिरिअस का राहावे?' असा सूर मतदारांमधून उमटत आहे. वंचित बहूजन आघाडीला यंदाच्या निवडणूकीत किती जागांवर वंचित आघाडी घेते हे पाहण्यासारखे असेल.



सिटी न्यूज वऱ्हाड
शुक्रवार, दि.९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अमरावती येथे आज प्रचार सभा

## ◆राकाँ महासचिव (संघटन) आ. संजय खोडके यांनी दिली माहिती

प्रतिनिधी ९ जानेवारी





**अमरावती :** महापालिका निवडणूक २०२६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या सर्व उमेदवारां या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची मुख्य प्रचार सभा आज शुक्रवार दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी संत गाडगेबाबा मंदिर समोरील प्रांगण गाडगेनगर, अमरावती येथे दुपारी ४ वाजता संपन्न होणार आहे.

या प्रचारसभेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार हे उपस्थित राहून संबोधित करणार आहे. तसेच पक्षाचे आजी-माजी खासदार व आमदार तसेच वरिष्ठ नेते सुद्धा या सभेला उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्याची माहिती पक्षाचे महासचिव (संघटन) आ. संजय खोडके यांनी दिली आहे. येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील २९ महानगर पालिकांमध्ये सार्वत्रिक निवडणूका पार पडणार आहेत. या निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या सर्व अधिकृत उमेदवारां या प्रचारार्थ ना. अजितदादा पवार यांची राज्यभर जाहीर सभा व प्रचारात सहभागी असून विविध ठिकाणी त्यांचा झंझावाती प्रचार सभांनी जोर धरला आहे. 'याला सर्व मतदारबांधवांचा उदंड असा प्रतिसाद लाभत आहे. त्याअनुषंगानने अमरावती महानगर पालिके' या सर्व २२ प्रभागांतील ८७ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कडून घड्याळ या चिन्हावर उभे असलेले ८५ उमेदवार व दोन मित्र पक्ष (उबाठा) चे उमेदवारां' या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे शुक्रवार दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी अमरावती नगरीत आगमन होणार आहे. या प्रचार सभेची महानगरात जोरात तयारी सुरु असून सर्व उमेदवार व सहकार्यांमध्ये सुद्धा उत्सुकता वाढली आहे. तरी सर्व सहकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सर्व फ्रंटचे पदाधिकारी तसेच उमेदवार व समस्त मतदार बांधवानी या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महासचिव (संघटन) आ. संजय खोडके व आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी केले आहे.

# हरिहर प्रभाग 17 मध्ये भाजप–राष्ट्रवादी महायुतीचा 'वचननामा' जाहीर

## ◆ विकासाचा अजेंडा घेऊन उमेदवार रिंगणात, प्रचार शिगेला पोहचला

प्रतिनिधी ९ जानेवारी




**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या रणधुमाळीत हरिहर पेठ प्रभाग क्रमांक १७ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या उमेदवारांनी आपला 'वचननामा' प्रसिद्ध करत प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. आगामी १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी महायुतीने आपल्या चारही उमेदवारांचे नाव निश्चित केले असून, प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याचे आश्वासन दिले आहे.

आज सकाळी हरिहर पेठ प्रभाग क्रमांक १७ मध्ये भाजप राष्ट्रवादी महायुतीच्या उमेदवारांचा संयुक्त प्रचाराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. महायुतीच्या उमेदवारांनी प्रभागातील नागरिकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण विकासकामांचा संकल्प सोडला आहे. महानगरपालिका शाळांसाठी उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करणे आणि नागरिकांसाठी आधुनिक आरोग्य केंद्रांची निर्मिती करून आरोग्य शिबिरे आयोजित करणे. नियमित स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रयत्न आणि प्रभागात २४ तास पाणीपुरवठा करण्यासाठी आधुनिक रुग्णवाहिकेसह नवीन जलवाहिन्यांचे नियोजन करण्याचे वचन उमेदवार देताना दिसत आहे. 'आम्ही प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. मतदारांनी आमच्यावर विश्वास दाखवून महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे,' असे आवाहन उमेदवारांकडून करण्यात आले आहे. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या या निवडणुकीत प्रभाग १७ मध्ये महायुतीचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत आहे.

वाशिम रोड प्रभाग क्रमांक १८ मध्ये महायुतीचा प्रचार जोरात

जुन्या शहरातील वाशिम रोड या प्रभाग १८ मध्ये राष्ट्रवादी उमेदवार कविता दिलीप देशमुख यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. भाजप व राष्ट्रवादी महायुतीच्या या प्रचाराला स्थानिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद आहे. राष्ट्रवादी काँग्रेस नेते दिलीप देशमुख यांच्या नेतृत्वात सुरु असलेल्या प्रचाराला चांगलाच वेग आला आहे.जुन्या शहरातील शिवसेना वसाहत, दुर्गा चौक या भागात राष्ट्रवादी व भाजप महायुतीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. प्रत्येक मुख्य चौकात हायमास्ट दिवे लावणे, भूमिगत गटार योजनेचे काम जलद गतीने पूर्ण करणे आणि उर्वरित रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे.महिलांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, शौर्य प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे आणि प्रभागातील बागांचे नूतनीकरण करून वृक्षारोपण करणे. युवक-युवतींसाठी खाजगी कंपन्यांमध्ये रोजगार मेळावे आणि उद्योगांसाठी कार्यशाळा घेणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणे. 'आम्ही प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. मतदारांनी आमच्यावर विश्वास दाखवून महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे,' असे आवाहन उमेदवारांकडून करण्यात आले आहे. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या या निवडणुकीत प्रभाग १८ मध्ये महायुतीचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत आहे.

# सुनीता अग्रवाल यांच्यासह संपूर्ण पॅनेलला मतदारांचा उदंड प्रतिसाद

प्रतिनिधी ९ जानेवारी

## सभांमध्ये नागरिकांची ,महिलांची आणि तरुणांची उपस्थिती लक्षणीय कृषी नगर प्रभाग भाजपमय करण्यावर उमेदवारांचा जोर कायम



**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या रणधुमाळीत कृषी नगर प्रभाग क्रमांक १३ मधील राजकीय वातावरण सध्या पूर्णपणे 'भाजपमय' झाल्याचे पाहायला मिळत आहे. विकासाचा अजेंडा आणि जनसंपर्काच्या जोरावर भाजपच्या सुनिता विजय अग्रवाल यांच्यासह त्यांच्या पूर्ण पॅनेलने प्रचारात मोठी आघाडी घेतली असून, विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

निवडणुकीचे बिगुल वाजल्यापासून कृषीनगर प्रभाग १३ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांचा धडाका सुरू आहे. सुनिता विजय अग्रवाल, विशाल इंगळे, प्राची निलेश काकड आणि अनिल मुरुमकार या चौघांनी प्रभागाचा कोपरा न कोपरा पिंजून काढला आहे. सुनिता अग्रवाल यांनी नगरसेवक म्हणून केलेल्या मागील कामांची पावती आज त्यांना जनसंपर्कातून मिळत आहे. त्यांच्या साध्या स्वभावामुळे आणि कामाप्रती असलेल्या जिद्दीमुळे महिला वर्गात त्यांचे विशेष आकर्षण दिसून येत आहे. या पॅनेलचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये अनुभवासोबतच तरुणाईचा उत्साहही पाहायला मिळत आहे. तरुण आणि तडफदार अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या प्राची निलेश काकड आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले अनिल मुरुमकार यांमुळे हे पॅनेल अधिक सक्षम बनले आहे. स्वच्छ प्रभाग, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि सरकारी शाळा-दवाखान्यांचे सक्षमीकरण ही या उमेदवारांची मुख्य आश्वासने मतदारांना भावत आहेत. प्रभागात ठिकठिकाणी होणाऱ्या कोपरा सभांमध्ये नागरिकांची, विशेषतः महिलांची आणि तरुणांची उपस्थिती लक्षणीय आहे. 'कमळ' या चिन्हासमोरील बटण दाबून या चौकडीला निवडून आणण्याचा निर्धार मतदारांनी केल्याचे चित्र सध्या दिसत आहे. मिळणारा हा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, प्रभाग १३ मध्ये भाजपचे पारडे सध्या जड असून विजयाचा गुलाल कोण उधळणार हे स्पष्ट होत आहे.

# जिल्ह्यातील शेत पांदण रस्त्यांसाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अमरावती :** जिल्ह्यातील शेत पांदण रस्त्यांसाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. यासाठी पाच कोटी रूपयांचा निधी देण्यात येणार आहे. लोकसहभागातून हे रस्ते होणार असून याकामासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. शेतकऱ्यांना शेतीमध्ये जाण्यासाठीची समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने पाऊल उचलले आहे. यासाठी लोकसहभागातून पांदण रस्ते बांधण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा नियोजनच्या निधीमधून ५ कोटी रूपयांचा निधी देण्यात येणार आहे. ही योजना लोकसहभाग आणि शासकीय निधीच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाणार आहे. योजनेसाठी प्रति किलोमीटर ९ लाख रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला आहे. यातील ७.५ लाख रुपयांचा निधी शासन देणार असून उर्वरित १.५ लाख रुपये लोकसहभागातून द्यावे लागणार आहेत. या योजनेचा पथदर्शी प्रकल्प अंजनगाव सुजी तालुक्यात राबविण्यात येणार आहे. या तालुक्यात २० किलोमीटर, तर इतर सहा तालुक्यात प्रत्येकी पाच किलोमीटरप्रमाणे ३० किलोमीटरचे पांदण रस्ते बांधण्यात येणार आहे. या कामासाठी लोकजागर या संस्थेची निवड करण्यात आली आहे. योजनेमुळे शेत रस्त्यांवरील अतिक्रमणे दूर होऊन शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेपर्यंत नेणे अधिक सुलभ होणार आहे. शेतरस्ते मोकळे करणे आणि जल पुनर्भरणासाठी हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात बारामाही शेत रस्ते तयार करण्यात येणार आहे. पाणंद रस्त्यांसाठी पाच किलोमीटरच्या आतील नदी व नाल्यांमधील गाळ व साहित्याचा वापर केला जाणार आहे. हे साहित्य स्वयंसेवी संस्थांना मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे जलस्त्रोतांचे खोलीकरण होऊन पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

# गुन्हे शाखा अमरावती शहर, यांनी तडीपार इसमास दहक्षत पसरवीत असतांना घातक शस्त्रासह ताब्यात



प्रतिनिधी ९ जानेवारी

**अमरावती :** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना गुप्त माहीती मिळाली की, तडीपार इसम उमेश मेश्राम हा मिलचाळ नवी वस्ती बडनेरा कडे जाणारा रोडवर हाता मधे चाकु घेवुन सार्वजनिक ठिकाणी दहक्षत निर्माण करीत आहे. अशा मिळालेल्या माहीती वरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर तडीपार इसम नामे उमेश महोदवराव मेश्राम वय ५० वर्ष रा. मिलचाळ नवीवरती बडनेरा यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु जप्त करून सदर इसमा विरुध्द पोलीस स्टेशन बडनेरा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १४२, १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव उमेश महादेवराव मेश्राम वय ५० वर्ष रा. मिलचाळ, नवीवस्ती बडनेरा जप्त करण्यात आलेला मुददेमाल एक लोखंडी चाकु, कि.अ. १०००/- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परीमंडळ-१ गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त परीमंडळ-२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय तथा गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परीमल, विकास गुडधे, नईम बेग, योगेश पवार, सागर ठाकरे यांनी केली आहे.

# भाजपच्या उमेदवारांना विजयी करा :विजय पनपालिया

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेस युतीला शहराच्या विकासासाठी, संस्कृती संवर्धनासाठी समाज हित यासाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स चे माजी अध्यक्ष विजय पनपालीया, ज्येष्ठ पत्रकार महेंद्र कवीश्वर, व्यापारी महेंद्र भाई गडिया यांनी केले.

प्रभात सहा, प्रभाग १९ प्रभाग २० प्रभाग १२ सह तसेच अकोला शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये भारतीय जनता पक्षाला मतदान करावं असे आव्हान करून शहराच्या विकासासाठी भारतीय जनता पक्षाचे योगदान तसेच स्वर्गीय वसंतराव नाईकानंतर देवेंद्र फडणवीस यांनी सगळ्यात जास्त निधी उपलब्ध करून दिला. विमानतळ रेल्वे खंडवा अकोला रेल्वेचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे विद्युतीकरण तसेच वेगवेगळ्या समस्या निराकारण्याची साठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार तीबल इंजन च सरकार आणण्यासाठी विजयी करा असे आव्हान त्यांनी केले आहे

# राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताहानिमित्त 12 ते 19 जानेवारी दरम्यान विविध कार्यक्रम

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अमरावती :** स्वामी विवेकानंद आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात दि. १२ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत 'राष्ट्रीय युवा दिन' व 'युवा सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि स्थानिक विविध शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. युवकांचा सर्वांगीण विकास करणे आणि त्यांना राष्ट्रीय व सामाजिक कार्यात सहभागी होण्यासाठी उद्युक्त करणे, हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी सांगितले. युवा सप्ताहाची सुरुवात १२ जानेवारी रोजी सकाळी ८:३० वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे उद्घाटन होईल. त्यानंतर सलग सात दिवस विविध स्पर्धा व उपक्रम राबविले जातील. शिवाजी हायस्कूल येथे १३ जानेवारी रोजी निबंध व चित्रकला स्पर्धा, १४ जानेवारी रोजी प्रेमकिशोर सिकची विद्यालयात पर्यावरण मार्गदर्शन, तर १५ जानेवारी रोजी संपूर्ण जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविले जाईल. मणिबाई गुजराती हायस्कूल येथे १६ जानेवारी रोजी तज्ज्ञ व्यक्तींचे अनुभव कथन, १७ जानेवारी रोजी श्री गणेशदास राठी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा आणि १८ जानेवारी रोजी आजनिय व विनर अॅकेडमीमध्ये पर्यावरण विषयावर मार्गदर्शन करण्यात येईल. या महोत्सवाचा समारोप १९ जानेवारी रोजी विभागीय क्रीडा संकुल येथे होणार आहे. या सर्व उपक्रमांत जिल्ह्यातील युवक-युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहितीसाठी श्रीमती त्रिवेणी बांते (क्रीडा अधिकारी) यांच्याशी संपर्क साधवा.

# अकोलेकरांच्या सन्मानासाठी भाजपला विजयी करा : खासदार अनुप धोत्रे



प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** अकोलेकरांच्या सन्मानासाठी भारतीय जनता पक्षाला विजयी करा असे आव्हान खासदार अनुप धोत्रे यांनी करून विकासात्मक कामासोबत विकासाचा विजन घेऊन सर्व स्पर्शी विकास करण्याचा संकल्प भारतीय जनता पक्षाने केला आहे त्यामुळे जनता जनार्दनाचा आशीर्वाद भाजपाला मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रभाग चार मध्ये पदयात्रेच्या माध्यमातून जनतेचे संवाद साधला त्यावेळी पल्लवी मोरे, मिलिंद राऊत, संदीप शेगोकार, शिल्पाताई वारोकार तसेच प्रशांत जोशी, सागर शेगोकार, नीतू महादेव जगताप , शशिकलात काळे यांच्यासाठी प्रचार प्रचारार्थ पदयात्रा जनसंपर्क माध्यमातून भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीला विजयी करण्याचा आवाहन केलं

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# शिर्ला शिवारातून सोयाबीन चोरीला; गुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ जानेवारी

**खामगाव :** शिर्ला शिवारातील गट क्रमांक २७४ मधील शेतातून सोयाबीन पिकाची चोरी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी रुख्मीनाबाई रामेश्वर चांदकर (वय ५६. रा. खेटी) यांनी हिवरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, फिर्यादी व आरोपी हे परस्पर नातेवाईक असून, शेतवाटणी व मालकी हक्काच्या वादातून त्यांच्यात दीर्घकाळापासून न्यायालयीन प्रकरण सुरू आहे. यावर्षी खरीप हंगामात फिर्यादीने सोयाबीनची पेरणी केली होती; मात्र १० ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी आरोपींनी नऊ जणांच्या मदतीने फिर्यादीच्या शेतातील सोयाबीन पिकाची मळणी करून पीक लंपास केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण न्यायालयीन वादाशी संबंधित असल्याने सुरुवातीला गुन्हा तत्काळ नोंदविण्यात आला नव्हता; मात्र नंतर न्यायालयाच्या आदेशानुसार तपास सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार अखेर दि. ६ जानेवारी रोजी आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता, २०२३ मधील कलम ३०३(२), ३२९(१), ६१(२), ३१७(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला

# मलकापूरात 17वर्षीय युवतीवर शारीरिक अत्याचार ; आरोपींविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ जानेवारी

**मलकापूर:** शहर व तालुक्यात खळबळ उडवून देणारी घटना समोर आली असून, एका १९ वर्षीय युवतीवर शारीरिक अत्याचार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात भारतीय दंड संहिता बीएनएस अंतर्गत गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, पीडित युवतीला आरोपी करण दादाराव वानखेडे (वय १९) रा.वरखेड याने वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर पीडितेने धैर्य एकवटून संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

**वैद्यकीय तपासणी व अहवाल**

घटनेनंतर पीडित युवतीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अहवालात पीडितेच्या शरीरावर दुखापतीच्या खुणा तसेच अत्याचारासंदर्भातील महत्त्वपूर्ण निरीक्षणांची नोंद करण्यात आली आहे. या वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांच्या तपासाला अधिक बळ मिळाले आहे. गंभीर कलमान्वये गुन्हा या प्रकरणी आरोपी करण दादाराव वानखेडे (वय १९) रा.वरखेड विरोधात बीएनएस मधील कलम ७४, ७५, १३७(२), ६४, ११५(२), ३५१(२)(३) सह इतर संबंधित कलमे लावण्यात आली आहेत. गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर असल्याने पोलिसांनी तपासाला गती दिली असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

# शेगावात अतिक्रमण हटाओ मोहीम

प्रतिनिधी ९ जानेवारी




**खामगाव** शेगांव शहरातील मंदिर परिसरासह प्रमुख चौक व रस्त्यांवरील अतिक्रमण हटाओ मोहीम राबविण्यात आली. दिवसभर सुरू असलेल्या या कारवाईमुळे शहरातील रस्ते मोकळे झाले असून, पादचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

मंदिर परिसर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अग्रसेन महाराज चौक, रेल्वे स्टेशन परिसर, एमईसीबी चौक, जगदंबा चौक, वाटिका चौक तसेच वानप्रकल्प परिसरातील रस्त्यांवर वाढलेले अतिक्रमण पोलिस बंदोबस्तात काढण्यात आले. कारवाईची चाहूल लागताच अनेक अतिक्रमणकर्त्यांनी स्वतःहून अतिक्रमणे हटविल्याचेही चित्र दिसून आले. पालिकेच्या या मोहिमेमुळे अतिक्रमणकर्त्यांमध्ये धास्ती निर्माण झाली असून, प्रशासनाच्या ठोस कारवाईचे शहरवासीयांनी स्वागत केले आहे. अतिक्रमण हटवल्याने रस्त्यांलगतची जागा मोकळी झाली असून, शहरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. शेगाव येथील शेगाव रेल्वे स्टेशन परिसरात नगरपरिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे एकच गोंधळ उडाला असून, या कारवाईविरोधात स्टॉलधारकांचा तीव्र आक्रोश पाहायला मिळाला. कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता थेट स्टॉल हटविण्यात आल्याने अनेक गरीब व कष्टकरी कुटुंबांच्या रोजीरोटीवरच नगरपालिकेने घाला घातल्याचा संतप्त आरोप स्टॉलधारकांकडून करण्यात येत आहे. शेगाव रेल्वे स्टेशन परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून चहा, नाश्ता, फळे, पाणी तसेच प्रवाशांसाठी आवश्यक वस्तूंचे छोटे स्टॉल लावून अनेक कुटुंबे आपली उपजीविका चालवत होती. मात्र नगरपरिषदेच्या अचानक व कठोर कारवाईमुळे हे स्टॉल हटविण्यात आल्याने संबंधित कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती निर्माण झाली आहे. 'आम्ही कुठे जावे? आमच्या लेकरांचे पोट कसे भरावे?' असा टाहो यावेळी स्टॉलधारकांनी फोडला.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# शहरात नायलॉन मांजाची खुलेआम विक्री

प्रतिनिधी ९ जानेवारी

**तेल्हारा :** संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या आकाशात रंगीबेरंगी पतंगांची उधळण सुरू झाली आहे. परंतु या रंगीत उत्पबाखाली प्राणघातक सावनी पसरत चालली आहे. बंदी असलेला नायलॉन म्हणजेच 'चायनीज मांजा', प्रशासनाच्या बंदीनंतरही शहरात खुलेआम विकला जात असल्याचे दिसून येत आहे. शहरातील मोचिपुरा परिसरातून मांचा विक्री होत आहे. राज्यात चायनीज मांजाची विक्रीवर बंदी असूनही शहरातील अनेक भागात राजरोसपणे मांजाची विक्री सुरू आहे. शहरात माहिती नुसार, एक रिल ७०० ते ९०० रुपयात विकला जातो. चामनीज मांजाची धार इतकी ती असते की तो मानवी त्वचा, मांस आणि अगदी स्नायूंनाही कापू शाकतो, नायलॉन मांजा विकला जात असून, नागरिकांच्या जीवाशी प्रशासन खेळते का असे प्रश्नचिन्ह तेल्हारा शहरांमध्ये निर्माण झाले आहे?

# प्रभाग १५ मध्ये भाजप उमेदवारांसह हरीश अलीमचंदानींचा झंझावात

◆ मित्र नगर, काँग्रेस नगरसह, वाठूरकर कॉलनीत जनसंपर्काचा धडाका ◆ हरिश आलिमचंदानी, मनिषा भंसाली, अरविंद टाले यांचा प्रचार वेगात

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** अकोला महानगरपालिका निवडणुकीचा ज्वर चढू लागला असून, भाजप चे अधिकृत उमेदवार हरीश अलीमचंदानी यांनी प्रचारात प्रचंड आघाडी घेतली आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या त्यांच्या झंझावाती पदयात्रांमुळे प्रभागात प्रभाव अधिकच वाढला असून, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळत आहे.



निवडणुकीच्या मैदानात भाजप ज्येष्ठ नेते हरिश अलीमचंदानी, मनिषा भंसाली, अरविंद टाले यांनी प्रभाग पंधरा मधील कोपरा न कोपरा पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. कालच त्यांनी कीर्ती नगर परिसरातून मोठा जनसमुदाय सोबत घेऊन आपली ताकद दाखवून दिली होती. तर त्याआधी बालाजी नगर, विद्या नगर आणि व्यंकटेश नगर या भागात त्यांनी घरोघरी जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यांच्या या सातत्यपूर्ण संपर्कामुळे विरोधकांच्या गोटात चांगलीच चर्चा आहे. आज सकाळपासूनच हरीश अलीमचंदानी यांनी आपला मोर्चा मित्र नगर, काँग्रेस नगर आणि वाठूरकर कॉलनीकडे वळवला आहे. 'प्रभागाचा कायापालट करणे आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या कायमस्वरूपी सोडवणे' हा एकच ध्यास घेऊन ते मैदानात उतरले आहेत. विशेष म्हणजे, प्रत्येक कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांनी आणि काँग्रेस नगरमधील तरुण वर्गाने त्यांचे जंगी स्वागत करत त्यांना आपला पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. ठिकठिकाणी होणारी गर्दी आणि महिलांचा मिळणारा प्रतिसाद पाहता, हरिश आलिमचंदानी, मनिषा भंसाली आणि अरविंद उर्फ बाळ टाले यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# प्रभाग १५ मध्ये मनसेची 'राज' गर्जना!

◆ पंकज साबळे यांचा मराठी मतांवर विशेष भर; कीर्ती नगरमध्ये रॅलीला उदंड प्रतिसाद

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** प्रभाग क्रमांक १५ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे डॅशिंग नेतृत्व पंकज साबळे यांनी प्रचारात मोठी मुसंडी मारली आहे. कीर्ती नगर परिसरात काढण्यात आलेल्या मनसेच्या प्रचार रॅलीला नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. 'मराठी पाऊल पडते पुढे'चा नारा देत साबळे यांनी आता थेट मतदारांच्या मनाचा ठाव घेण्यास सुरुवात केली आहे.



प्रभाग १५ च्या रिंगणात असलेले पंकज साबळे यांनी आपला प्रचाराचा रोख प्रामुख्याने स्थानिक मुद्यांवर आहे. कीर्ती नगर भागात निघालेल्या रॅलीमध्ये मनसेच्या झेंड्यांनी आणि घोषणांनी संपूर्ण परिसर निनादला होता. या रॅलीत तरुणांचा सहभाग लक्षणीय होता, जे पंकज साबळे यांच्या 'हक्काचा माणूस' या प्रतिमेकडे आकर्षित होत आहेत. केवळ रॅली आणि सभांवर अवलंबून न राहता, पंकज साबळे यांनी 'डोअर-टू-डोअर' प्रचारावर भर दिला आहे. दररोज हजारो लोकांशी ते प्रत्यक्ष भेटून सकारात्मक संवाद साधत आहेत. 'तुमचा प्रश्न, माझा लढा' या भावनेतून ते नागरिकांच्या समस्या जाणून घेत असून, घराघरातून त्यांना प्रेमाचा आणि विश्वासाचा कौल मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रभागातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी आणि स्थानिक तरुणांच्या रोजगाराचा मुद्दा पंकज साबळे यांनी प्रभावीपणे मांडला आहे. घरोघरी सुरू असलेल्या या थेट संवादामुळे पंकज साबळे यांनी अल्पावधीतच मतदारांशी भावनिक नाते निर्माण केले आहे. यामुळे प्रभाग १५ मध्ये 'रेल्वे इंजिन'ची गती वाढली असून, मनसेचे पारडे जड होताना दिसत आहे.

# मतदानाची टक्केवारी वाढीसाठी मनपा सज्ज

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात ८ जानेवारी रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे मनपा उपायुक्त विजय पारतवार यांच्याव्दारे मतदानाचा टक्केवारी मध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने मतदान केंद्र पर्यवेक्षक यांची मतदान चिठ्ठी वितरण संदर्भात बैठक झाली.



या बैठकीमध्ये अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अन्वये अकोला महानगरपालिका व्दारा विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेकरीता आवश्यक असलेल्या मतदान स्लीप वाटप करण्याचे कार्यही आवश्यक असून अकोला महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागांसाठी मतदार यादीवर काम करणारे ५० पर्यवेक्षकांना तसेच त्यांच्या अधिनस्त ५०० बी.एल.ओ. आणि १५० आशा वर्कर असे एकुण ६५० कर्मचा-यांच्या माध्यमातून मतदान चिठ्ठी वितरण करण्यात येणार असून सदरचे काम दि. ९ जानेवारी पासून ते १३ जानेवारी २०२६ पर्यंत पुर्ण करणे, तसेच या संदर्भात मतदारांना १०० टक्के सहकार्य करणे आदींबाबात सुचना मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी यावेळी दिली आहे. या बैठकीत मनपा उपायुक्त विजय पारतवार, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, छपाई साहित्य नोडल अधिकारी तथा शहर अभियान व्यवस्थापक संजय राजनकर, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनुप चौधरी, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा यांचेसह सर्व पर्यवेक्षकांची उपस्थिती होती.

# अकोल्यात समाजसेवा, जनसंपर्कात शिवसेना नेत्या उषा विरक अग्रेसर

प्रतिनिधी ९ जानेवारी

◆ सिव्हिल लाईन्स प्रभाग १ २ क च्या उमेदवार उषा विरक यांचा प्रचार सुरु
◆ शिवसेना नेत्या उषा विरक यांच्या कामामुळे त्यांची सर्वत्र ओळख कायम
◆ उषा विरक यांच्या कार्य, जनसंपर्क यांच्यामुळे प्रभागात दबदबा कायमच

**अकोलाः** अकोला महापालिकेत महिलांचा बुलंद आवाज निर्माण करण्यात उषा विरक यांची ओळख आहे. शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावर त्यांना व्यापक प्रतिसाद मिळत असून शिवसेना मुख्यनेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेत त्यांनी दिलेले भाषण चांगलेच गाजले देखील.

अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ 'क' मध्ये महिला नेतृत्व आणि समाजसेवेचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) नेत्या उषा विरक यांनी गेल्या अनेक वर्षांत केलेल्या सामाजिक कार्यामुळे आणि महिलांसाठी उभ्या केलेल्या विविध उपक्रमांमुळे मतदारांमध्ये विश्वास निर्माण केला आहे. त्यामुळे प्रभागात त्यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. उषा विरक या केवळ निवडणुकीपुरत्या सक्रिय नसून, त्या वर्षभर समाजसेवेच्या माध्यमातून नागरिकांच्या संपर्कात राहिल्या आहेत. महिलांचे प्रश्न, गरजू कुटुंबांची मदत, आरोग्य, स्वच्छता आणि



मूलभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे प्रभाग १२ 'क' मध्ये त्या एक संवेदनशील आणि कार्यक्षम महिला नेतृत्व म्हणून ओळखल्या जातात. नुकत्याच पार पडलेल्या शिवसेनेच्या प्रचार सभेत उषा विरक यांनी महिलांसाठी असलेल्या शासनाच्या योजनांवर विशेष भर दिला. 'लाडकी बहीण' योजनेसह विविध समाजकल्याणकारी उपक्रमांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या भूमिकेमुळे महिला मतदारांमध्ये विशेष सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

महिलांची सुरक्षा, स्वच्छ पाणी, चांगले रस्ते, आरोग्य सुविधा आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत प्रश्नांवर काम करण्याची ठोस भूमिका उषा विरक यांनी मांडली आहे. समाजसेवेचा अनुभव आणि महिलांच्या प्रश्नांची जाण यामुळे प्रभाग १२ 'क' मध्ये त्यांचे नेतृत्व अधिक भक्कम होताना दिसत आहे.

# प्रभाग १५ मध्ये भा.ज.पा. कार्यालयाचे उद्घाटन



प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १५ मधील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार हरीश आलिमचंदानी, मनीषा भंसाली, बाळ टाले आणि शारदा खेडकर यांच्या कार्यालयाचे उदघाटन थाटात झाले. सिंधी कँपमध्ये नैनवानी हॉस्पिटलच्या वरच्या भागात कार्यालय थाटले आहे.

उदघाटन प्रसंगी हिरालाल कृपलानी, विनोद मनवानी, अनूप शर्मा, रणजीत खेड़ेकर, रवीन्द्र भंसाली, स्वानंद कोंडोलीकर, रमेश अलीमचंदानी, प्रकाश अलीमचंदानी, मणिभाई जसमतिया, शेखर शेळके, अजय बोधानी, सुशील राजपाल, गिरिधर पोपटानी, सुधीर बेलानी, उदय जोशी, दीपक मनवानी, बबलू धनवानी, सोनू जसूजा, मनीष बुंदेले, हरीश अमानकर पाटिल, श्रीकांत गवांडे, ऋषिकेश महले, शुभम् महले, स्वप्निल भगत, प्रज्वल काकड़, सन्नी शंके, गजानन दूबे, मयूर शिंदे उपस्थित होते.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शहरात दोन सभा

◆ भाजप आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना देणार विजयाचा मंत्र
◆ दोन्ही सभांना हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** अकोला महानगरपालिकेवर पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी तसेच महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शनिवारी शहरात दोन जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले आहे. या सभांना भाजप आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.



राज्याचे महसूल मंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे शनिवारी, १० जानेवारी रोजी राजराजेश्वर नगरीत भारतीय जनता पार्टी-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी दोन जाहीर सभा घेणार आहेत. जुने शहरातील राठोड पंच बंगला परिसर आणि शिवाजी पार्क भागात आयोजित या जाहीर सभांना चंद्रशेखर बावनकुळे संबोधित करतील आणि भाजप व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना 'विजयाचा मंत्र' देतील. या दोन्ही सभांना भारतीय जनता पार्टीचे राज्य सचिव तथा आमदार रणधीर सावरकर, पालकमंत्री ॲड. आकाश पुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार अमोल मिटकरी, राष्ट्रवादीचे महानगर प्रमुख विजय देशमुख, भाजप नेते विजय अग्रवाल, जयंत मसने, वैशालीताई शेळके, कृष्णा शर्मा, किशोर मांगटे पाटील यांसह अनेक वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या दोन्ही सभांना भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादीच्या हजारो कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले जात आहे.

# सर्वांगीण विकासासाठी भाजपला मत

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्षाला मत राहणार आहे, असा विश्वास प्रभाग क्रमांक ३ मध्ये व्यक्त होताना दिसत आहे. प्रभाग क्रमांक तीनचे भाजप उमेदवार सागर शेगोकार, प्रकाश जोशी, नीतू जगताप, शशिकला काळे यांचा प्रचार सध्या न्यू तापडिया नगर परिसरात सुरू आहे. गुरूवार, शुक्रवार असे दोन दिवस त्यांचा या भागात संपर्क सुरू आहे.

शुक्रवारी सकाळ पासून न्यू तापडिया नगर, पवन नगरी, खरप भागात मतदारांशी संपर्क साधला. चारही उमेदवारांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. प्रचारा दरम्यान भारतीय जनता पक्षाचे विकासाचे संकल्प पत्र मतदारां पर्यंत पोहचवला जात आहे. हा भाग भारतीय जनता पक्षासाठी पोषक आहे. आमदार रणधीर सावरकर यांनी अकोला पूर्व मतदार संघाच्या माध्यमातून



मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहे. तसेच खासदार अनुप धोत्रे, महानगर अध्यक्ष जयंत मसने आणि भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी यांचा या भागाशी संपर्क असतो. त्यामुळे झालेल्या विकासाची जाणीव मतदारांना देखील आहे. प्रभाग ३ मध्ये उमेदवारांसह कार्यकर्ते देखील उत्स्फूर्त प्रचार करीत आहेत. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत ते प्रचारात मग्न असतात. कारण येत्या गुरुवारी मतदान आहे. येत्या काही दिवसांत अधिकाधिक मतदारांशी संपर्क साधण्याचा उमेदवारांचा प्रयत्न आहे.

# अकोला महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांव्दारे रॅलीच्या माध्यमातून मतदार जनजागृती

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोलाः** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. ८ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांव्दारे मतदान जनजागृती रॅली, काढून



शाळापरिसरांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली आहे. या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील सहभाग आणि जबाबदार मतदाराची भूमिका याबाबत जागृत करण्यात येत आहे. आजच्या जनजागृती रॅलीमध्ये महानगरपालिका गुजराती शाळा क्रमांक १, महानगरपालिका सिंधी हिंदी शाळा क्रमांक १, आर्य समाज मंदिर, डीएव्ही कॉन्व्हेंट अकोला तसेच स्वावलंबी विद्यालय अशा ५ शाळांचा समावेश होता. सदर रॅलीची सुरूवात मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी मतदार जनजागृती हरिश्चंद्र इटकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली.

यावेळी नोडल अधिकारी नईम फरास, मुख्याध्यापक गजेंद्र ढवळे, मुख्याध्यापक युवराज पठाडे सर, हरीश शर्मा सर, राहुल जी ठाकूर, विपुल राणा, यांचे सह सर्व शाळांचे शिक्षक तसेच पालक उपस्थित होते

# पाटसुल महाआरोग्य शिबिराचा हजारो रुग्णांनी घेतला लाभ

प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोटः** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम पाटसुल रेल्वे येथे प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष कुलदीप वसु यांनी मोफत भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले होते त्या शिबिरात गरजू असंख्य लोकांनी शिबिराचा लाभ घेतला आहे तेथे सर्व प्रथम सहकार नेते याची हिदायत पटेल यांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली.

लाभ घेतलेल्या रुग्णांपैकी दहा तारखेला डोळ्याच्या ऑपरेशनची पहिली गाडी ही पाटसुल रेल्वे आश्रमातूनच निघणार आहे त्यांनी दिलेल्या तारखेत सर्व रुग्णांना वर्धा




सावंगी येथे ऑपरेशन साठी नेण्यात येणार आहे आणि ऑपरेशन नंतर त्यांना अजून त्याच ठिकाणी सोडवण्यात येणार आहे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रहार गणेश गावंडे, शेखर साबळे, निखिल दोड यांचे मोलाचे योगदान लाभले शिबिरात उपस्थिती सुशील पुंडकर, डॉ. गजानन महल्ले, दयाराम धुमाळे, बंडू वाघोडे, विठ्ठल नारे, योगेश गायकवाड, पिंपरी पो पाटील सुखदेव डिक्कर, जीवन खवले, भैय्या डीक्कर, ज्ञानेश्वर दहीभात, अतुल गावंडे, सुमेध बागलकर, मंगेश राऊत, माधव डिक्कर, शुभम नारे, शेखर बेंडवल, राहुल देशमुख, शुभम भिसे, ओम् भिसे, प्रतीक भिसे, ओम् म्हसळ, ब्रह्मा भिसे, पवन डिक्कर, प्रद्युम डिक्कर, बिट्टू रोडे, गोपाल गायकवाड, राजू काळे, रोशन दिवनाले, अवि घायासुंदर, सागर पुंडकर, अंकुश ढगे, रोहित गाडेकर, रोशन दिवनाले, योगेश शिरसठ, अनिल तायडे, पाटेकर, अनिकेत काळे, जयकुमार गाडे, संदीप पाचमासे, गौरव गोटे, अभी इचे, संदीप वाघमारे, सागर थोरात, प्रशांत चौधरी, सुशांत भिसे, ऋषिकेश भिसे, शुभम म्हैसणे विठ्ठल वसु, आकाश भिसे, सुरेंद्र गावंडे, क्षावा चे निवृत्ती वानखडे तसेच सुखदास महाराज गाडेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेश परिसरातील आशा वर्कर यांनी सहकार्य केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# 'सहकाराशिवाय प्रगती शक्य नाही'

## काकासाहेब कोयटे: नेर अर्बनची आर्णी शाखा लोकार्पित

प्रतिनिधी ९ जानेवारी




**यवतमाळ :** नेर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीने सहकार क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले असून, त्यांच्या आर्णी शाखेचा लोकार्पण सोहळा दि. ७ जानेवारी रोजी येथील बागोरी संकुलात मोठ्या थाटात पार पडला. समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यात सहकारी पतसंस्थांचे योगदान महत्त्वाचे असून, केंद्र सरकारच्या सकारात्मक सहकार धोरणामुळे ही चळवळ सक्षमपणे पुढे जात असल्याचे गौरवोद्गार या सोहळ्याचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष मा. काकासाहेब कोयटे यांनी काढले. नेर अर्बन जनतेच्या विश्वासास पात्र सोहळ्याचे उद्घाटन यवतमाळ जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष राजूदास जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना जिल्हा सहकारी संस्थेचे उपनिबंधक मा. नानासाहेब चव्हाण यांनी नेर अर्बनच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांनी नमूद केले की, "विपरीत परिस्थितीतसुद्धा नेर अर्बनने सामाजिक बांधिलकी जपत जनतेचा विश्वास कायम ठेवण्यास यश मिळवले आहे. त्यामुळेच नेर अर्बनच्या ठेवी ४२५ कोटींच्यावर पोहोचल्या आहेत." सामाजिक उत्तरदायित्वाचा वसा प्रास्ताविक भूमिकेत नेर अर्बनचे सचिव प्रशांत काळे यांनी पतसंस्थेच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट केला. ते म्हणाले, "ज्यांना नोकरी नाही, अशा सवंगड्यांना संधी उपलब्ध करून देणे हा आमचा प्रारंभी उद्देश होता. मात्र, पुढे आम्ही सामाजिक उत्तरदायित्वाचा वसा स्वीकारत नैराश्याने खचलेल्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आणि गरजूना आर्थिक मदतीचा हात दिला."

आज जनतेच्या विश्वासाच्या भांडवलावर संस्था समाजाची आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्यासाठी तत्परतेने कार्य करत असून, सहकार चळवळीला भरीव योगदान देत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आर्णी शाखेचे व्यवस्थापक अजय कृष्णराव पुनसे यांनी सांगितले की, ७ जानेवारी रोजी नेर अर्बनचे सचिव प्रशांत आनंदराव काळे यांचा वाढदिवस असणे आणि याच दिवशी शाखेचा लोकार्पण सोहळा साजरा होणे, हा नेर अर्बन परिवारासाठी केवळ योगायोग नसून दुग्धशर्करा योग आहे. यावेळी केक कापून प्रशांत काळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

सुंदर वास्तू साकारल्याबद्दल वास्तू शिल्पकार श्रीपाद अविनाश काळे यांचा यावेळी सहृदय सत्कार करण्यात आला. माल्यार्पण कार्यक्रमाची सुरुवात नेर अर्बनचे प्रेरणास्थान प.पू. ब्रह्मलिन केशवानंद महाराज आणि राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. या सोहळ्याला गोदावरी अर्बन मल्टीस्टेटचे एम.डी. धनंजय तांबेकर, बालाजी एन्टरप्रायजेसचे गोपालसेठ नवाबासी, लेखापरीक्षक सुरेश कट्यारमल, सहकार अधिकारी कवडू नगराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, नेर अर्बनचे उपाध्यक्ष सुनील दरोई, सचिव प्रशांत काळे, संचालक पवन परळीकर, पुरुषोत्तम महिंद्रकर, चंद्रभान मानतुटे, संचालिका उज्वला चिरडे, महाव्यवस्थापक प्रदीप झाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळमेघ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल विक्रांत दुधे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सुनील दरोई यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर्णी शाखेचे व्यवस्थापक अजय पुनसे व सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# आर्णीच्या नगराध्यक्षपदी नालंदा भरणे विराजमान

प्रतिनिधी ९ जानेवारी




**आर्णी :** आर्णी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी नालंदा किसनराव भरणे यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. नगरपरिषदेच्या सभागृहात आयोजित पदग्रहण सोहळ्यात विविध पक्षांचे नेते, नगरसेवक व कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ख्वाजा बेग होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री अँड. शिवाजीराव मोघे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आरीज बेग, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिल आडे, जितेंद्र मोघे, राजीव विरखेडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) गटनेत्या निलोफर बेग, शिवसेना (शिंदे गट) गटनेते पवन चाफले उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नगरसेवक अमोल मांगुळकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष नालंदा भरणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या भाषणातून शहराच्या विकासासाठी सर्वपक्षीय सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. नगराध्यक्ष नालंदा भरणे यांनी आपल्या मनोगतात पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, शिक्षण, आरोग्य व स्वच्छता या मूलभूत सुविधांवर विशेष भर देणार असल्याचे सांगितले. शासनाकडून मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर करून शहरातील विकासकामे प्रामाणिकपणे राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. "माझ्यावर टाकलेला विश्वास कधीही डळमळीत होऊ देणार नाही. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन शहराचा सर्वांगीण विकास साधू," असे त्यांनी स्पष्ट केले. मुख्याधिकारी रविंद्र राऊत यांनी नगराध्यक्ष भरणे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांनी पदभार स्वीकारला. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन नगरसेवक अमोल मांगुळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरिष कुडे यांनी केले.

या सोहळ्याला काँग्रेसचे निता खुशाल ठाकरे, अश्विनी संजय राऊत, मलनस राफी अ. रज्जाक, शाह यास्मिन बानो रहमान, भावना जयराज मुनेश्वर, सैय्यद रियाज वहाब, प्रिती योगेश शिवरामवार, अमोल सुधाकर मांगुळकर; राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे निलोफर साजिद बेग, परशराम देवराव कुमरे, शेख रूकसाना परविन मोहिबोहिन, अंजली संदिप खंदार, अशपाक खालीक शेख, संजय बंडु व्यवहारे, वर्षा विशाल रासमवार, अनवर खान सलदार खान पठाण; शिवसेना (शिंदे गट)चे पवन सुरेश चाफले, छबु मनोज चारोळे, विशाल नारायण मनवर, निलेश रमेश गावंडे; भाजपच्या वैशाली विशाल चव्हाण (देशमुख) तसेच उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शितल प्रविण काळे आदी नगरसेवक उपस्थित होते.

# मारेगाव तालुक्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

प्रतिनिधी ९ जानेवारी

**मारेगाव :** तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीवर दीर्घकाळ लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वैद्यकीय तपासणीत पीडित मुलगी गर्भवती असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर हा गंभीर प्रकार समोर आला.

पीडित मुलगी ही अल्पवयीन असून सध्या शाळेत शिक्षण घेत आहे. आरोपी हा गावातीलच सुमारे ३० वर्षीय युवक असून तो पीडितेच्या घरी नेहमी ये-जा करत होता. नोव्हेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत घरात कोणी नसताना आरोपीने वारंवार जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

आरोपीने धमकी दिल्यामुळे भीतीपोटी पीडितेने हा प्रकार कोणालाही सांगितला नव्हता. तिच्यामध्ये होत असलेल्या काही बदलामुळे तिच्या आईने मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी वणी येथील खासगी रुग्णालयात नेले.

तिथे तिची सोनोग्राफी तपासणी केली असता पीडित मुलगी अडीच महिन्यांची गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पीडितेने आईकडे संपूर्ण प्रकार उघड केला आईने तात्काळ मुलीसह मारेगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी आरोपीविरोधात BNS कलम 64(2), 64(2)(m), 65(1) तसेच POCSO कायद्यांतर्गत कलम 3(a), 4, 5(j), 5(l), 6 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्याम वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांचे पथक कार्यरत आहे.

# संतविचारांचा गजर; महिला हरिपाठ मंडळाची स्थापना

प्रतिनिधी ९ जानेवारी



**उमरखेड :** संतांचे विचार तालुक्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचावेत, तसेच लहान वयातच मुलांवर सुसंस्कार घडावेत, या उद्देशाने वारकरी साहित्य परिषद उमरखेड तालुक्याच्या वतीने मुक्ताई, जनाई, बहिणाई महिला हरिपाठ मंडळ शाखेची नुकतीच स्थापना करण्यात आली.

ज्ञानेश्वर माऊलींच्या चार प्रमुख ग्रंथांपैकी हरीपाठ हा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. प्रत्येक घराघरात हरीपाठाचे वाचन व्हावे, धर्मकार्याची आवड निर्माण व्हावी आणि येणाऱ्या पिढीला संत परंपरेची प्रेरणा मिळावी, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ह.भ.प. श्री विठ्ठल पाटील काकाजी (संस्थापकीय अध्यक्ष), ह.भ.प. श्री गुलाबराव महाराज आळंदीकर (जिल्हाध्यक्ष) तसेच शितलताई लाड यांच्या आदेशानुसार गावोगावी महिलांना प्रेरित करून महिला हरिपाठ मंडळांच्या शाखा स्थापन करण्याचे कार्य सुरू आहे.

वारकरी साहित्य परिषद उमरखेड तालुका अध्यक्षा ह.भ.प. सौ. तिरूपतीताई बालाजीराव सुरोशे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तालुक्यात हे कार्य राबविले जात असून, श्री देवबन महाराज गोस्वामी यांच्या सहकार्याने व ह.भ.प. श्री ब्रह्मटेकें महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ही चळवळ विस्तारत आहे.

तालुक्यातील खेडोपाडी, वाडीवस्त्यांमध्ये हरिपाठाच्या माध्यमातून हरिनामाचा गजर व्हावा, टाळ–मृदंगाच्या तालावर अभंगांचे भक्तिमय गायन व्हावे, यासाठी जनाई, मुक्ताई व बहिणाई महिला हरिपाठ मंडळाच्या तालुका कार्यकारिणी सदस्य महिलांनी पुढाकार घेतला आहे. ह.भ.प. सौ. जिजाबाई देवबन गोस्वामी (बाळदीकर), ह.भ.प. सौ. वंदनाताई विठ्ठल कदम तसेच सौ. संध्याताई देवानंद पुजारी यांनी अनेक गावांमध्ये शाखा स्थापनेसाठी मोलाचे सहकार्य केले असून, महिला अघाडी उमरखेडच्या माध्यमातून हा उपक्रम अधिक बळकट होत आहे.

# १० जानेवारीला भाऊसाहेब माने समाजभूषण पुरस्कार वितरण

## विविध क्षेत्रांतील आठ मान्यवरांचा गौरव

प्रतिनिधी ९ जानेवारी

> ■ तालुक्यात होऊन गेलेल्या महान समाजसुधारक व लोकनेत्यांच्या कार्याचा आदर्श समाजासमोर यावा, तसेच त्यांच्या प्रेरणेतून अखंड समाजकार्यात योगदान देणाऱ्यांचा सन्मान व्हावा, या उद्देशाने भाऊसाहेब माने प्रतिष्ठानचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. विजयराव माने यांच्या संकल्पनेतून स्व. भाऊसाहेब माने समाजभूषण पुरस्काराचे आयोजन करण्यात येते.



**उमरखेड :** तालुक्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व सामाजिक संस्थांचा महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त भाऊसाहेब माने गौरव कृती समितीच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मान केला जातो. याच परंपरेनुसार यंदाही शुक्रवार, १० जानेवारी रोजी जिजाऊ सांस्कृतिक भवन, उमरखेड येथे भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आठ व्यक्ती व एका सामाजिक संस्थेला भाऊसाहेब माने समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

स्व. जेठमलजी माहेश्वरी व स्व. बंकटलाल भुतडा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ क्रीडा क्षेत्रातील योगदानासाठी सतीश मुडे, स्व. देवराव पाटील चोंढीकर व स्व. विठ्ठलराव देशमुख सवनेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद यांचा गौरव होणार आहे.

स्व. नारायणराव शिलार व स्व. नारायणराव वानखेडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्यासाठी संभाजी भोयर, तर स्व. रामचंद्र सिंगनकर व मरहूम अमानुल्ला जहागीरदार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था, उमरखेड यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

स्व. वामनराव उत्तरवार व स्व. गुलाबसिंग ठाकूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिव्यांग उद्योजक प्रशांत सराफ, स्व. सखाराम नरवाडे गुरुजी व स्व. सखाराम मुडे गुरुजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी नागेश मिरासे (जिल्हा परिषद शाळा, विडूळ), स्व. भाई केशवराव देवसरकर व स्व. परसराम पिलवंड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महिला सशक्तीकरणासाठी कार्यरत रविता लकडे (पो. फाळी) तसेच स्व. नानासाहेब देशमुख व स्व. भास्करअण्णा गोविंदवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उत्कृष्ट रेशीम शेती करणारे सुशील मुधळे यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन भाऊसाहेब माने गौरव कृती समितीचे मुख्य मार्गदर्शक डॉ. विजयराव माने, अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, सचिव बालाजी वानखेडे, कार्याध्यक्ष अविनाश चंद्रवंशी, शेतकरी कष्टकरी संघाचे अध्यक्ष देवानंद पाटील मोरे, शुभम माने व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# पोलीस स्थापना दिनानिमित्त सद्भावना दौड

प्रतिनिधी ९ जानेवारी




## रोहित पिंपरे व रूपाली मेश्राम विजेते

**राळेगाव :** पोलीस स्थापना दिनानिमित्त २ ते ८ जानेवारी दरम्यान पोलीस स्टेशन राळेगाव व लोकसहभागातून पोलीस स्थापना दिन सप्ताह साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत सद्भावना दौडीचे आयोजन करण्यात आले होते. पुरुष व महिला अशा दोन गटांत ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

पुरुष गटात रोहित पिंपरे यांनी प्रथम, चैतन्य नाकाडे यांनी द्वितीय तर अनिकेत साकेवार यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. महिला गटात रूपाली मेश्राम प्रथम, पायल येवले द्वितीय व आचल झाडे तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. सर्व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस म्हणून सायकल व मेडल प्रदान करण्यात आले.

बक्षीस वितरण सोहळा ठाणेदार शीतल मालते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नगरसेवक सुरेश गहरवाल, शशिकांत धुमाळ, शासकीय कंत्राटदार राजू दुधपोळे, भाजप शहराध्यक्ष शुभम मुके, गजानन काळे, गोवर्धन वाघमारे, प्रगतशील शेतकरी सतीश देवरकर, अशोक पिंपरे, पोलीस निरीक्षक योगेश दंदे, विशाल बोरकर आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रुपेश जाधव, संजय रामगडे, गोपाल वास्टर, सुरज चिव्हाने, विशाल कोवे, निलेश पवार, प्रशांत आडे, राजेश पानसे, राजू शेंडे, अंकुश कोयताडे, प्रतीक्षा तितरमारे, किरण मुरस्कार, प्रिया बोरकर, शीतल आडे आदींनी परिश्रम घेतले.

# स्वयंरोजगारातून सक्षम व्हा; 'निर्माण' प्रकल्पातील महिलांना जिल्हाधिकाऱ्यांचा कानमंत्र

प्रतिनिधी ९ जानेवारी

**झरी–जामणी :** महिलांनी स्वयंरोजगार, उद्योजकता तसेच स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय स्वीकारून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीणा यांनी केले. अंधारवाडी येथील नियोजित गाव दौऱ्यादरम्यान 'निर्माण' प्रकल्पांतर्गत आयोजित महिला बचत गटांच्या अभ्यास भेट व प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

युनायटेड वे मुंबई यांच्या अंमलबजावणीतून आणि जॉन डीअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या आर्थिक सहाय्यातून 'निर्माण' प्रकल्प झरी–जामणी तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत महिला स्वयंसहाय्यता गटांसाठी मधाचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या अंधारवाडी येथे अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात ५५ महिला सहभागी झाल्या. अभ्यास दौऱ्यादरम्यान महिलांना मधमाशी पालन, मध उत्पादन प्रक्रिया, संगोपन, पॅकेजिंग तसेच बाजारपेठेतील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून उत्पन्नवाढ कशी साधता येईल, यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा येथील सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्री. अमित रंजन (आयएएस), खादी ग्रामोद्योग निरीक्षक आर. एल. तायडे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक अतुल इंगळे, RSETI चे संचालक दीपक तिवारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बी. एम. राठोड तसेच RSETI च्या फॅकल्टी तेजश्री कडू यांनी




उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले.यावेळी शासन, नाबार्ड, खादी ग्रामोद्योग व RSETI यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, कर्ज व आर्थिक सहाय्याच्या संधींची माहिती देण्यात आली. या अभ्यास भेटीचे यशस्वी आयोजन 'निर्माण' प्रकल्प टीमने केले. तालुक्यातील विविध गावांतील महिला बचत गट सदस्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# बाळासाहेब देशमुख सवनेकर यांच्या स्मृतींना अभिवादन

## संवेदना सोशल फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी ९ जानेवारी



**पुसद :** लोकनेते व सहकार महर्षी बाळासाहेब देशमुख सवनेकर यांच्या ३१व्या स्मृतिदिनानिमित्त संवेदना सोशल फाऊंडेशनच्या वतीने येथील जिल्हा परिषद शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात रक्तगट तपासणी, दंतरोग तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करून त्यांच्या कार्याला आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीरामपूरचे सरपंच आशिष काळबांडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संवेदना सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष किरण देशमुख सवनेकर, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षक यशवंत देशमुख, ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे, जितेंद्र चिद्दवार, गिरीधर ठेंगे उपस्थित होते. तर तज्ज्ञ डॉक्टर म्हणून दंतरोगतज्ज्ञ डॉ. गजानन धबडगे, डॉ. वैभव धबडगे, डॉ. संजय पडोळे व डॉ. नयनश्री वानखेडे यांनी सेवा दिली. यावेळी मुख्याध्यापक श्रीराम वानखेडे, प्रा. मंजिरी ढेकेकर यांचीही उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांनी बाळासाहेब देशमुख सवनेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. अध्यक्षीय भाषणात सरपंच काळबांडे यांनी बाळासाहेब सवनेकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला.

संवेदना सोशल फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी स्मृतिदिनानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. यावर्षी श्रीरामपूर येथील जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा, मातोश्री जिल्हेवार विद्यालयातील विद्यार्थी तसेच डॉ. पंजाबराव देशमुख अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापक यांच्यासाठी मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना टूथपेस्ट, ब्रश व खाऊचे वाटपही करण्यात आले.

डॉ. गजानन धबडगे यांनी दातांची स्वच्छता कशी राखावी याचे प्रात्यक्षिक दाखवून दातांचे प्रकार व दातांचे आरोग्यातील महत्त्व स्पष्ट केले. शिबिरातील विद्यार्थ्यांना पुढील उपचारांसाठी मोफत संदर्भ सेवा देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. संजय पडोळे यांनी सिकलसेल आजार, रक्तगट तपासणीचे फायदे, रक्तदानाचे महत्त्व तसेच सकस आहाराविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. नयनश्री वानखेडे यांनी आपण याच जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन डॉक्टर झाल्याचा अनुभव सांगत, झेडपी शाळांकडे कमीपणाने पाहू नये, असा संदेश दिला.

या शिबिरात शेकडो विद्यार्थी व उपस्थितांची दंतरोग, रक्तगट व आरोग्य तपासणी करण्यात आली. तंत्रज्ञ स्वप्निल गादेकर व ऋषी कवडे यांचे विशेष सहकार्य लाभले. मोफत सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा संवेदना सोशल फाऊंडेशनतर्फे सन्मान करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक विजया गणूवाड, माया शिरल्लू, झरकर, कविता देवकर तसेच विद्यार्थी मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

# पत्रकार क्रिकेट चषक २०२६ चे उद्घाटन

प्रतिनिधी ९ जानेवारी



**पुसद :** पत्रकार क्रिकेट क्लब पुसद यांनी सलग तिसऱ्या वर्षी पत्रकार क्रिकेट चषक २०२६ चे आयोजन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशवंत रंगमंदिर स्टेडियम येथे केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस ठाणेदार सेवानंद वानखेडे होते, तर उद्घाटन नवनिर्वाचित नगराध्यक्षा मोहिनीताई इंद्रनील नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन खेळ, सामाजिक सलोखा आणि प्रशासनातील समन्वय जपणारा एक प्रेरणादायी उपक्रम म्हणून उपस्थित मान्यवरांनी त्याचे कौतुक केले. नवीन नगराध्यक्षा मोहिनीताई यांनी आपल्या भाषणात खेळांच्या महत्त्वावर प्रकाश टाकत, प्रशासन व समाजातील एकता निर्माण करणारे असे उपक्रम अधिकाधिक राबवावेत, असा संदेश दिला. पत्रकार क्रिकेट क्लबच्या या उपक्रमात १६ संघांचा सहभाग असून, ते शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिला आहे. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी आशिष बिजवाल, पोलीस ठाणेदार सुरेंद्र राऊत, डॉ. मोहम्मद नदीम, डॉ. अखिल मेमन, धीरज धाडवे, डॉ. शिवाजी भुरके, डॉ. सतीश चिदरवार, सुधीर देशमुख, डॉ. वडते, प्रकाश भोसले, रवी देशपांडे, प्रकाश लामने, ललित सेता, मो. इरफान, जिया शेख, अनवर अली उपस्थित होते. यावेळी पत्रकार क्रिकेट क्लब पुसद यांच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा पत्रकारांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक हरीमकर आणि राम राठोड यांनी केले, तर प्रास्ताविक बाबाराव उबाळे यांनी आणि आभार राजेश ढोले यांनी मानले. या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार क्रिकेट क्लब पुसदचे सदस्य मारुती भस्मे, विजय निखाते, मोहम्मद मुबसिर शेख, विनय राठोड, बाबा खान, मनीष दशरथकर, अनिल चव्हाण पाटील, अकिब रिजवी, मोहम्मद हनीफ, मोहम्मद फहेद, संजय रेक्कावार, प्रकाश खिल्लारे, शंकर माहुरे, अ. हमीद शेख, लक्ष्मण कांबळे, दुर्गेश कान्हू, पवन चव्हाण, शेख महेबूब, शब्बीर शेख, दीपक धर्माधिकारी, नवाज अली यांचे विशेष सहकार्य राहिले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६







## भ्रष्टाचारातून पैशाचा आदर, अनुदान लाटण्याचा केला गदर...

# नियमांचा केला अनादर, बोगस बिले सादर!

## फळबाग लागवड न करता अनुदान हडपले *पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील रिसोड, तालुक्यात फळबागांची लागवड न करताच फळबाग योजनेचे अनुदान लाटल्याचे शेकडो प्रकार समोर येत आहेत. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे गावातील एकाच कुटुंबातील पती-पत्नीच्या नावावर विहीर खोदण्याआधीच फळबाग योजनेतून लाखों रुपयांचे अनुदान हडप केले असल्याची माहिती हाती आली आहे. सदर अनुदान लाटण्यासाठी नियमांचा अनादर करत, बोगस बिले सादर करण्यात आले.





या गंभीर प्रकाराची महसूल व कृषी विभागाने स्थळ पाहणी करून यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सुद्धा देशमुख यांनी केली आहे. मध्यंतरी राज्यभर गाजलेल्या अकोला 'पोकरा' प्रकल्पात काही शेतकरी गटांनी घेतलेल्या अवजारे बँक प्रकरणाची विविध स्तरावर सखोल चौकशी झाली होती. त्याच धर्तीवर रिसोड तालुक्यात राबविण्यात आलेल्या फळबाग योजनांची चौकशी करून दोषींवर तातडीची कारवाई करण्याची मागणी होत आहे.

विधान परिषदेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कृषी विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतील भ्रष्टाचार संदर्भात लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना तत्कालीन कृषिमंत्री यांनी अवजारे बँक उभारणीच्या कामात अकोला जिल्ह्यात अनियमितता झाली असल्याचे कबूल केले होते. परिणामी अमरावती विभागीय कृषी सहसंचालकांनी चौकशीचे आदेश दिले होते. यात ११५ पैकी २४ शेतकरी गटांची तपासणी केली असता यातील तीन गटांकडे अवजारेच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले होते. तर काही गटांच्या विरोधात फौजदारी कारवाई प्रस्थापित करण्यात आली होती. यात तब्बल ३ कोटी १७ लाख रुपयांची वसुली करण्याचे निर्देशीत केले होते. तीच स्थिती रिसोड तालुक्यात राबविण्यात आलेल्या फळबाग योजनांची झाली असून, योजनेतील फळबाग लागवड न करताच अनुदान हडपल्याचा खळबळ जनक प्रकार शेलुखडसे गावातून पुढे येत आहे. या गंभीर प्रकाराची महसूल व कृषी विभागाने स्थळ पाहणी करून सखोल चौकशी करावी अशी मागणी होत आहे. कारण फळबाग लागवड करणाऱ्या लाभार्थ्याने लागवडीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे बंधनकारक असते. त्यानंतर योजनेच्या नियमांनुसार लागवड केलेल्या कलमांच्या, रोपांच्या खरेदी पावत्या अपलोड करून लागवड केलेल्या क्षेत्राचे जिओ - टॅगिंग केले जाते आणि ही सर्व कार्यवाही पार पाडल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करूनच अनुदान जमा केले जाते. मात्र हे सर्व असताना भ्रष्टाचार घडतोच कसा ? हा एक अनुत्तरित प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे या गंभीर प्रकाराची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

## थोडक्यात

### स्व. किसनराव सदार विद्यालयाची शैक्षणिक सहल

#### ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

तालुक्यातील खडकी सदार येथील स्व. किसनराव सदार विद्यालय या शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात पार पडली. सहलीतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांसमवेत विविध धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेटी दिल्या. कडाक्याच्या थंडीत सुद्धा विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून सहल प्रमुख आणि सोबत असलेल्या शिक्षकांनी प्रत्येक स्थळांचे महत्व पटवून सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या या यशस्वी सहली बद्दल संस्थेच्या अध्यक्षा स्वातीताई सदार, संजय सदार, युवा उद्योजक ज्ञानेश्वर सदार आणि पालकांनी अभिनंदन केले. खडकी सदार येथील स्व. किसनराव सदार विद्यालयाची शैक्षणिक सहल याही वर्षी मोठ्या उत्साहाच्या, आनंदात, व मनोरंजनाच्या, वातावरणात, पार पडली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला, एवढ्या थंडीमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. तीन दिवस मनोरंजनाचे, अभ्यासाला सुट्टी, प्रवासाचा आनंद, ऐतिहासिक वास्तूला भेट, सांस्कृतिक वारशाला भेट, भौगोलिक निसर्गाची पाहणी, तसेच काही पवित्र तीर्थक्षेत्राला भेट, अशा विविध पैलूंनी सजलेली ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरणार. शाळेतल्या आठवणीचा, एक त्यांच्या मनात गिरवलेला धडा, या शैक्षणिक सहलीमध्ये शिर्डी, शनिशिंगणापूर, लेण्याद्री, ओझर, देवगड, देहू, आळंदी, असे तीर्थक्षेत्र, सिंहगड, शिवनेरी, अशा ऐतिहासिक वास्तू, गड किल्ले भौगोलिक, नैसर्गिक सुंदरता, तसेच पुण्याजवळील कात्रज येथील प्रसिद्ध प्राणी संग्रहालय, राजीव गांधी उद्यान, अशा विविध स्थळांना विद्यार्थ्यांनी भेट देऊन, तेथील इतिहास ,संतांचाविचार, किल्ल्यांचा इतिहास, प्रत्यक्ष पाहून जाणून घेतला, प्राणी संग्रहालयामधील विविध प्राण्यांची पाहणी, म्हणजेच जैवविविधता त्यामुळे या सहलीचा जो उद्देश होता म्हणजेच प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करून निरीक्षण करून विद्यार्थ्यांना शिकणे, हा उद्देश सफल झाला, यामध्ये विद्यार्थ्यांनी नव्हे तर शिक्षकांनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुद्धा उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला, अशाप्रकारे आमच्या विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात पार पडली असल्याची माहिती शाळेच्या सहल प्रमुखांनी दिली आहे.

### य.च.महाविद्यालयात क्रांतीसूर्य सावित्रीबाई फुले जयंती संपन्न

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

श्री. मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात दि.०३ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे क्रांतीसुर्य सावित्रीबाई फुले जयंती दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे हे होते. कु. अनुश्री मुळे हिने आपले मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात क्रांतीसुर्य सावित्रीबाई फुले यांचे स्त्रियांसाठी असलेले योगदान याबाबत सविस्तर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. नम्रता धनजकर यांनी केले. या कार्यक्रमाला रासेयो. कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## रिसोड तहसीलचा अफलातून कारभार, एकाच खरेदीखतावर दोनवेळा फेरफार

### जवळा येथील बनावट फेरफार प्रकरण कथित अधिकाऱ्यांच्या अंगलट येणार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांच्या वडीलोपार्जित, मालकी हक्काच्या शेताचे बनावट फेरफार प्रकरण कथित अधिकाऱ्यांच्या अंगलट येणार असल्याचे संकेत प्राप्त झाले आहेत. चाटे यांच्या गट क्र. ५/१ मधील १.१६ आर शेताचा बनावट फेरफार क्रमांक १२९९ दिनांक ७/७/२०२५ रोजी करण्यात आला. हा फेरफार करतांना दस्त क्र.२९९/१९६९ चा आधार घेण्यात आला आहे. परंतु याच दस्ताच्या आधारे यापुर्वी फेरफार क्र.६७ दिनांक ६/६/१९८५ रोजी घेण्यात आला होता. दोन्ही फेरफार एकाच खरेदी खतानुसार झाल्याने रिसोड तहसिलचा अफलातून व भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर आला आहे.

रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांच्या गट क्र.५/१ चे बनावट फेरफार प्रकरण राज्याच्या महसूल मंत्र्यांपर्यंत पोहोचले आहे. उल्लेखनिय म्हणजे रमेश चाटे यांची शिल्लक जमिन १.१६आर असून दस्त क्र.२९९/१९६९ मध्ये १.२० आर जाधव यांनी चाटे यांचेकडून १९६९ मध्ये खरेदी केल्याचे नमूद आहे. याच खरेदी खतानुसार ती जमिन फेरफार क्र.६७ दिनांक



६/६/१९८५ रोजी जाधव यांच्या नावाने आधीच करण्यात आली आहे. महसूल विभागाचे फेरफार करण्याचे सॉफ्टवेअर मध्ये खरेदी खतावरील आणि ७/१२ वरील जमिनीचे क्षेत्रफळ सारखेच असेल तरच 'त्या' फेरफाराची नोंद होत असल्याचे समजते, परंतु रिसोड तहसिल मधील भ्रष्टांनी त्याच खरेदी खताच्या आधारे फेरफार क्र.१२९९ दिनांक ७/७/२०२५ घेतल्याने जबाबदार अधिकाऱ्यांच्या कार्रप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. क्षेत्रफळात तफावत असतांना शासनाच्या सॉफ्टवेअरने फेरफार क्र.१२९९ कसा मंजूर केला ? याबाबतही रिसोड परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. या सर्व गैरव्यवहाराची तक्रार रमेश चाटे यांनी महसूलमंत्र्यांकडे केली असून वरिष्ठ स्तरावरून या प्रकरणाची सखोल चौकशी होणार असल्याचे वृत्त आहे. याप्रकरणासोबतच रिसोड तालुक्यातील मागील पाच वर्षातील सर्व फेरफाराचीही सखोल चौकशी होणार असल्याचे समजते. या चौकशीने रिसोड तहसिलमधील भ्रष्ट अधिकारी व कथित कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाल्याची चर्चा आहे.




## श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त नादब्रह्म भजनी मंडळाची भावपूर्ण भजन सेवा



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

गुरुमंदिर संस्थान चा ७२६ वा जन्म उत्सव सोहळा २२ जानेवारी पासून ते २ फेब्रुवारी दरम्यान ४५ दिवसाचा मोठया उत्सहात साजरा केला जातो आहे. अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. या अंतर्गत सौ. अश्विनी सस्तकार यांचे नादब्रह्म भजनी मंडळ यांनी दि. २७/१२/२५..शनिवार ला भजन सेवा गुरुमहाराजाच्या चरणी सादर केली, याचे सूत्रसंचालन.. सौ भाग्यश्री खेडकर यांनी केले.

तसेच भजनाला सुरेख बनविण्यासाठी साद हवी असते ती हार्मोनियम व तबला वादक यांची हार्मोनियम वादक उमेश आजनकर सर व तबला वादक प्रथमेश सस्तकर तसेच भजनाची शोभा वाढली ती भजनामध्ये केलेल्या वेगवेगळ्या वेशभूषा मुळे ,नृत्य सादरीकरणामुळे यामध्ये २२ बाल कलाकारांनी सहभाग घेतला होता. बाल कलाकारांचे सर्व नियोजन, सौ. श्रद्धा मनिष रगडे, यांनी केले. सौ. प्रीती समर्थ व सोनाली पायल यांचे सहकार्य लाभले.

नादब्रह्म भजनी मंडळ तर्फे सौ माधुरी खेडकर यांनी गायलेलं गाणं प्रेक्षकांना मोहित करणार आहोत तसेच शितल काकडे यांनी सुद्धा खूप सुंदर भजन गायले नादब्रह्मण भजनी मंडळ यांचा शेवटी संस्थांतर्फे सत्कार करण्यात आला.

## जिल्हाधिकारी साहेब नका होऊ सह्याजीराव!

● संतोष आढाव @ मालेगाव ●

* शासनाचे रस्ते कधी घेणार मोकळा श्वास
* मालेगांव ते पांगरी नवघरे रस्ता हडपला
* अनेक वर्षाच्या मागणीला केराची टोपली

मालेगांव ते पांगरी नवघरे या ब्रिटिश कालीन रस्त्यावर अक्षरशा भव्य इमारती उभारल्या गेल्या आहेत. महसूल प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षितपणामुळे मालेगांव ते पांगरी नवघरे रस्त्यावरच भव्य इमारती उभारल्या गेल्या आहेत. याबाबत अनेक वेळा जनतेने रस्त्याला मोकळा करण्याची मागणी केल्यानंतर ही सुद्धा सदर मागणीला केराची टोपली दाखवण्यात आली. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मालेगांव हे ऐतिहासिक गाव म्हणून ओळखले जाते. मालेगावकडे ब्रिटिश काळी माहूर पर्यंत जहागीरदारी होती तेव्हापासून मालेगाव चे नाव मालेगांव जहागीर म्हणून सर्वश्रुत आहे, स्वतंत्र काळानंतर वाढती लोकसंख्या पाहता मालेगाव शहराच्या चारही बाजूने शेतांचे लोकवस्तीत रूपांतर झाले. त्यामध्ये अनेक महाशयांनी शासनाच्या जमिनी हडपल्या आहेत. त्यावरही कळस म्हणजे मालेगावच्या जुन्या बसस्थाना का पासून व गोयंका नगर ला लागून मालेगाव ते पांगरी नवघरे पांदन रस्ता हडपून त्यावर पक्क्या इमारती उभारल्या आहेत. याबाबत अनेक वेळा रस्ता मोकळा करून देण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु सदर मागणी निषफळ ठरली असल्याचे दिसून येते. एकीकडे शासन पांदण (शेत) रस्ते मोकळे करण्याचे वेळोवेळी आदेश काढत असताना मात्र दुसरीकडे प्रशासनाच्या वेळकाढू धोरणामुळे मालेगाव ते पांगरी नवघरे रस्ता इमारती खाली लुप्त झालेला असल्याचे दिसून येते. अलीकडच्याच शासन आदेशानुसार प्रत्येक पांदण रस्त्याला नांव व नंबर (प्रजिमा) देण्याचे महसूल



प्रशासनाला सांगण्यात आले. परंतु महसूल प्रशासनाच्या हलगर्जी पणामुळे अद्यापही मालेगाव ते पांगरी नवघरे पांदण रस्त्याबाबत कोणतीच कारवाई करण्यात आली नाही.

संपूर्ण महाराष्ट्रात वाशिम जिल्हा हा कर्तव्य प्रणालीवर चालणारे प्रशासन म्हणून ओळखले जाते. त्यामुळे वाशिम जिल्हाधिकाऱ्यांनी सह्याजीराव न होता ?क्शन मोडवर येऊन मालेगाव ते पांगरी नवघरे रस्ता त्वरित सामान्य जनतेतून होत आहे.

## स्वीकृत सदस्य, उपाध्यक्षपदासाठी चुरस!

### मंगरूळपीर न.प. मध्ये कोण ठरणार सरस

● रमेश मुंजे @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर नगरपालिका प्रशासकीय वर्तुळात आणि राजकीय गोटात सध्या स्वीकृत सदस्य उपाध्यक्ष पद आणि विषय समित्यांच्या निवडीवरून मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. १५ जानेवारी रोजी ह्या निवडी होण्याची माहिती असून सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंनी मोर्चेबांधणीला वेग आला असून, फोडाफोडीचे राजकारण टाळण्यासाठी 'फिल्डिंग' लावली जात आहे.



#### उपाध्यक्ष आणी कॉप्शन (स्विकृत सदस्य) मेंबरसाठी रस्सीखेच...

उपाध्यक्षपदासाठी भाजपाकडुन गणेश खोडे यांचे नाव चर्चेत असुन दुसरीकडे राष्टवादीकडुन कॉप्शन मेंबरसाठी जनतेतुन नगराध्यक्ष पदी निवडुन आलेले अशोकभाऊ परळीकर यांचे मोठे बंधु जे नगरसेवक निवडणुकीत पराभुत झालेले आहेत त्या चंदुभाऊ परळीकर यांची निवड करणार असल्याची चर्चा आहे.

नुकताच नगर पालिकेचा निकाल जाहीर झाला असून नगराध्यक्ष पदी राष्ट्रवादी काँग्रेसचे अशोकभाऊ परळीकर हे विजयी झाले आहेत. तर २१ सदस्य संख्या असलेल्या नगर पालिकेत भाजपा १०, राष्ट्रवादी अजित पवार ०५ काँग्रेस ०१, एम आय एम ०१, शिवसेना शिंदे ०१ अपक्ष ०३ असे पक्षीय बलाबल आहे. स्वीकृत सदस्य, उपाध्यक्ष आणि महत्त्वाच्या विषय समित्यांच्या ( पाणीपुरवठा, बांधकाम, शिक्षण, नियोजन) सभापती निवडीसाठी हालचालींना उधाण आले आहे.

फोडा फोडीच्या भीतीने 'सहली'चे नियोजन निवडणुकीत आपल्या गटाचे संख्याबळ टिकवून ठेवण्यासाठी अनेक पक्षांनी आपल्या नगरसेवकांना अज्ञात स्थळी किंवा पर्यटनासाठी पाठवण्याची तयारी केली आहे. विरोधी गटाकडून गळाला लागण्याची शक्यता असल्याने पक्षप्रमुखांनी विशेष खबरदारी घेतली आहे. बांधकाम समिती ही शहरातील विकासकामांच्या निविदा आणि नियोजनावर नियंत्रण ठेवते. पाणीपुरवठा समिती थेट जनतेशी निगडित महत्त्वाचे खाते आहे.

तर शिक्षण व आरोग्य समितीला बजेट आणि अंमलबजावणीचे अधिकार आहेत. त्यामुळे पदे कमी व इच्छुक जास्त असल्याने सध्या चांगलीच रस्सीखेच बघायला मिळत आहे.

## ग्रामीण भागातील अनेक गावातील जलजीवन योजना ठरत दिवसास्वप्न!

● दिपक मापारी @ रिसोड ●

रिसोड तालुक्यात शासनाच्या जल जीवन योजनेची कामे अनेक गावात रखडल्याने नागरिक तहानलेलेच आहेत. ही योजना बहुतांश गावात दिवासास्वप्न ठरत आहे.



घोटा येथे जलजीवन योजनेचे टाकीचे बांधकाम पूर्ण झाले असून, ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाकडे धाव घेतली असता ग्रामपंचायत यांच्याकडून सांगण्यात आले आहे की, शासनाकडून निधी मिळत नसल्या कारणाने आम्ही समोरचे काम कसे करायचे असा सवाल उपस्थित केला आहे.

शासन प्रशासनाने तालुक्यातील अनेक गावात रखडलेल्या कामांना गती देण्याची गरज आहे..



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# प्रभागातील विकास कामांच्या जोरावर यंदाही प्रभाग 13 मध्ये भाजपाचेच पॅनल निवडून येणार– सुनीता अग्रवाल

प्रतिनिधी ९ जानेवारी




**अकोला :** आज महिला सुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. देशातील महिलांना ५०ℨ आरक्षण लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. त्या आरक्षणाची मी सुद्धा एक लाभार्थी आहे. मी माझ्या प्रभाग १३ मध्ये ९०ℨ विकास कार्य केले आहे. फक्त राहिलेले ओपन स्पेस आणि गार्डनचे दहा टक्के काम बाकी आहे. ते यावेळेस निवडून आल्यावर पूर्ण केले जाईल. माझ्या परिसरातील महिलांच्या सुरक्षेसाठी संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील. माझ्या प्रभागात स्वच्छता आहेच, परंतु ही स्वच्छता आणखी कशी चांगली होईल याकडे माझा कटाक्ष राहील. युवकांच्या शिक्षणासाठी आणि रोजगारासाठी आमचे लाडके आमदार रणधीर भाऊ सावरकर यांचे जे व्हिजन आहे त्यानुसार एमआयडीसी मध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच प्रभागातील महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून तर माझे प्रयत्न चालू आहेतच, परंतु आमदार सावरकर साहेबांनी जो आता नवीन प्रोजेक्ट आणला आहे त्यात केवळ महिलांना प्राधान्य दिले जाईल. आम्हा पती-पत्नींना संपूर्ण प्रभागात नागरिकांकडून प्रेम मिळते, त्या प्रेमाच्या आधारावरच आमची वाटचाल सुरू आहे. लोकांच्या विश्वासाला कुठेही तडा न जाऊ देता आम्ही विकास कामात स्वतःला झोकून दिले आहे. कोरोना काळात तर मी स्वतः दररोज ३०० ते ४०० लोकांचे जेवण बनवून घरपोच जेवणाची व्यवस्था केली होती. तसेच प्रभागात रक्तदान शिबिर घेणे असो, किंवा कोणाला दवाखान्यासाठी घेऊन जाणे असो यंदा ॲम्बुलन्स सुद्धा आम्ही उपलब्ध करून देणार आहोत.

परिसरातील सर्व स्तरातील महिलांशी माझा नेहमीच संपर्क असतो, त्यामुळे महिला कार्यकर्त्यांची मोठी फळी माझ्या पाठीशी नेहमी असते. केवळ विकास कामाच्या जोरावरच यंदा या प्रभागात भाजपाचे संपूर्ण पॅनल निवडून येईल हा मला ठाम विश्वास आहे असे मत भाजपाच्या प्रभाग १३ च्या उमेदवार सौ सुनीता अग्रवाल यांनी आर आर सी न्यूज च्या अकोल्याचे धुरंदर या कार्यक्रमात व्यक्त केले. अकोल्याचे धुरंदर हा कार्यक्रम आरआरसी चैनल वर नुकताच प्रसारित झाला होता. तसेच युट्युब वर सुद्धा हा कार्यक्रम उपलब्ध आहे. ज्यांनी हा कार्यक्रम पाहिला नसेल त्यांनी युट्युब वर हा कार्यक्रम पहावा असे आवाहन करण्यात येत आहे

# यंदा महापालिकेवर निश्चितच फडकणार भगवा – उषाताई विरक

प्रतिनिधी ९ जानेवारी




**अकोला :** आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात एकनाथ शिंदे साहेबांनी महाराष्ट्राचा जो विकास केला तसेच लाडकी बहीण योजना, लेक लाडकी, लाडकी सून तसेच शेतकरी हिताच्या ज्या योजना राबविल्या हे पाहता अकोला शहरातील नागरिकांनी सुद्धा जो नेहमीच नागरिकांच्या हिताचे कार्य करतो त्यालाच मतदान करावे असे आवाहन प्रभाग बाराच्या शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार तसेच सहा वेळा आदर्श नगरसेविका असलेल्या उषाताई विरक यांनी केले. शिवसेना जिल्हा महिला प्रमुख असताना प्रभाग १२ मध्ये विकास कामांसाठी दोन करोड रुपयांचा निधी आपण आणला. आता यापुढे प्रभागात जी कामे झाली नाही ती कामे त्वरित पूर्ण करणार. विशेषता आमच्या परिसरात चोरीच्या घटना जास्त होत असल्याने प्रभागातील प्रत्येक गल्लीबोळात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार, तसेच प्रभागात चार ठिकाणी लहान लहान गोरक्षण संस्थानाची निर्मिती करून तेथे मोकाट गुरांना चारा देण्याची व्यवस्था करणार. याआधी हा प्रभाग मी पूर्णपणे म्हशींचा गोठा मुक्त करून ठेवला आहे. त्यासाठी मला उच्च न्यायालयात सुद्धा जावे लागले. मी नेहमीच नागरिकांच्या हिताचा विचार करते त्यासाठी काही मुठभर लोक दुखावले तरी चालतील. माझ्या प्रभागात जी झोपडपट्टी होती त्या ठिकाणी महिलांना उघड्यावर शौचालयात जाणे भाग पडत होते. परंतु मी स्वावलंबी विद्यालयाच्या मुख्याध्यापकांची चर्चा करून त्यांच्या जागेवर सुंदर शौचालयाची निर्मिती केली आहे त्यामुळे त्या महिला नेहमीच माझे नाव काढतात. परिसरातील युवकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी युवकांना जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडून सात लाख रुपयांचे व्यायामाचे साहित्य मी उपलब्ध करून दिले आहे. परिसरातील सौंदर्यीकरण बगीच्यांची निर्मिती करून करण्यात आले आहे. प्रभाग १२ हा शहरातील सर्वात आदर्श प्रभाग मला करून दाखवायचा आहे. जेणेकरून हा प्रभाग पाहण्यासाठी दुरून दुरून लोकांनी यायला पाहिजे त्यासाठी मला एकटीला नव्हे तर संपूर्ण पॅनलला नागरिकांनी प्रभाग १२ मधून निवडून द्यावे असे मी आवाहन करते असे मत प्रभाग बाराच्या शिवसेनेच्या उमेदवार उषाताई विरक यांनी आर आर सी न्यूज वरील धुरंदर या कार्यक्रमात व्यक्त केले. आतापर्यंत शेकडो नागरिकांनी हा कार्यक्रम आरआरसी चॅनलवर तसेच युट्युब वर बघितला. जर आपणही हा कार्यक्रम पाहिला नसेल तर युट्युब वर हा कार्यक्रम आपण पाहू शकता

# सागर भारुका यांचा विकासकामांचा झंझावात; जनसेवेच्या जोरावर प्रचारात मारली मुसंडी!

**सिव्हिल लाईन प्रभाग १२ मध्ये विकास कामाचा झंझावात**
**उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना नेते सागर भारूका आहेत रिंगणात**
**नालेसफाई, सबमर्सिबल पंप दुरुस्ती करत जनसेवा कायम सुरुच**



प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** महाकाली माता मंदिर परिसरात नाली चोकअप झाली तर लगेच सागर भारुका यांनी कामगार पाठवित काम सुरु केले. मातृशक्तीला दिलासा देण्याचा प्रयत्न सागर भारुका यांनी केला. नालेसफाई काही दिवसांपासून पेडिंग होती त्याला गती आणली.

अकोला महानगरपालिका निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून, सिव्हिल लाईन प्रभाग क्रमांक १२ मध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खंबीर नेतृत्व सागर भारुका यांनी आपल्या कार्यशैलीने मतदारांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'निवडणूक येवो वा न येवो, सेवा थांबणार नाही' या ब्रीदवाक्याप्रमाणे भारुका यांनी प्रभागात विकासकामांचा धडाका लावला असून, त्यांच्या या जनसेवेची चर्चा सध्या संपूर्ण परिसरात रंगत आहे. सिव्हिल लाईन प्रभाग १२ मधील नागरी समस्या सोडवण्यासाठी सागर भारुका नेहमीच अग्रभागी राहिले आहेत. नुकतेच महाकाली माता मंदिर परिसरात नाल्या चोकअप झाल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. ही बाब समजताच भारुका यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता तात्काळ आपल्या यंत्रणेसह कामगार पाठवले आणि युद्धपातळीवर नालेसफाईचे काम पूर्ण केले. गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या कामाला गती मिळाल्याने स्थानिक मातृशक्तीने समाधान व्यक्त केले आहे. केवळ नालेसफाईच नाही, तर प्रभागातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठीही सागर भारुकांचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. बंद पडलेले सबमर्सिबल पंप दुरुस्त करून नागरिकांची तहान भागवण्याचे काम त्यांनी स्व पुढाकाराने केले आहे. मूलभूत गरजांना प्राधान्य देणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची प्रतिमा दिवसेंदिवस उंचावत आहे. प्रभाग १२ मध्ये शिवसेना (उबाठा) गटाकडून रिंगणात उतरलेले सागर भारुका यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

प्रचाराच्या काळात केवळ आश्वासने न देता, प्रत्यक्ष कृतीतून नागरिकांचे प्रश्न सोडवण्यावर त्यांचा भर आहे. यामुळे महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, 'मशाल' चिन्हाचा प्रभाव प्रभागात अधिकच गडद होत चालला आहे. सामान्यांच्या अडीअडचणीला धावून जाणारे व्यक्तिमत्व आणि विकासाची दृष्टी असलेल्या सागर भारुका यांच्यामुळे प्रभाग १२ मध्ये शिवसेनेचे पारडे जड दिसत आहे. आता येणाऱ्या निवडणुकीत मतदार कोणाला कौल देतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# भीमनगर प्रभाग 9 मध्ये भाजप–राष्ट्रवादी महायुतीचा 'वचननामा' जाहीर

प्रतिनिधी ९ जानेवारी



**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या रणधुमाळीत भीमनगर प्रभाग ९ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या उमेदवारांनी आपला 'वचननामा' प्रसिद्ध करत प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. आगामी १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी महायुतीने आपल्या चारही उमेदवारांचे नाव निश्चित केले असून, प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याचे आश्वासन दिले आहे. आज सकाळी भीमनगर प्रभाग ९ मध्ये भाजप राष्ट्रवादी महायुतीच्या उमेदवारांचा संयुक्त प्रचाराला चहा कारखाना, भीमनगर या भागात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. महायुतीच्या उमेदवारांनी प्रभागातील नागरिकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण विकासकामांचा संकल्प सोडला आहे. महानगरपालिका शाळांसाठी उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करणे आणि नागरिकांसाठी आधुनिक आरोग्य केंद्रांची निर्मिती करून आरोग्य शिबिरे आयोजित करणे. नियमित स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रयत्न आणि प्रभागात २४ तास पाणीपुरवठा करण्यासाठी आधुनिक रुग्णवाहिकेसह नवीन जलवाहिन्यांचे नियोजन करण्याचे वचन उमेदवार देताना दिसत आहे. 'आम्ही प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. मतदारांनी आमच्यावर विश्वास दाखवून महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे,' असे आवाहन उमेदवारांकडून करण्यात आले आहे. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या या निवडणुकीत भीमनगर प्रभाग ९ मध्ये महायुतीचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत आहे.

# राज्य सरकार कामगारांचे हित जोपासणारे : आकाश फुंडकर




प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** कामगारासाठी अनेक योजना भारतीय जनता पक्षाच्या सरकारने सुरू केल्या आहेत. जात पात धर्म न पाहता कामगारांच्या कल्याणासाठी योजना राबवणारे सरकार आहे. कामगार आणि शेतकरी शेतमजूर यांच्या कल्याणासोबत महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या कल्याणासाठी कार्यरत असणार तसेच अकोला शहराच्या विकासाला चालना देणार नेतृत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील नेतृत्व कार्य करत आहे. या कार्याला गती देण्यासाठी भारतीय जनता पक्षाला विजयी करा असे आवाहन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले. अकोला महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी आजपासून पालकमंत्री नामदार फुंडकर यांनी प्रचाराचा अभियान सुरू केला आहे या अभियानांतर्गत वेगवेगळ्या कामगार संघटनेसोबत चर्चा करून शहरातील प्रभाग १० मधील उमेदवार वैशालीताई शेळके, अनिल गरड, नितीन ताकवले मंजुषाताई शेळके, अजय रामटेके, ज्योती मानकर, हर्ष चौधरी शितल गायकवाड , पवन महल्ले, आरती धोगलीया, निकिता देशमुख, हर्षद भाबरे, खेडकर, यांच्या प्रचारार्थ पालकमंत्री नामदार पुंडकर यांनी जनसंपर्क अभियान केला त्या प्रसंगी ते बोलत होते त्यांच्यासोबत आ. रणधीर सावरकर, विजय अग्रवाल, विजय पनपालिया, महेंद्र कविश्वर, सिद्धार्थ शर्मा कृष्णा शर्मा संजय जीरापुरे, तुषार भिरड, अमोल गीते किशोर कुचके हेमंत शर्मा आदी सोबत होते

# राज्यातील ट्रिपल इंजिन सरकार मुळे वेगाने विकास : आ. रणधीर सावरकर

प्रतिनिधी ९ जानेवारी



**अकोला :** हद्दवाढ क्षेत्राचा विकास करण्यासाठी १२० कोटी रुपये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देऊन रस्ते नाली तसेच मूलभूत सुविधा भवन उपलब्ध करून दिले आहे १३८ कोटी रुपये अजून देऊन विकास करण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी जिला आहे आरोग्य सेवा विमानसेवा पशुवैद्य शैक्षणिक सुविधा सोबत, अकोला खंडवा रेल्वे लाईन चा काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे आकोट ते हिवरखेड पर्यंत तुकाई खेळ पर्यंतच काम मोठ्या जोमाने सुरु असून २०२६ च्या शेवटपर्यंत मध्यप्रदेशला जोडल्या जाणार आहे. भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीला प्रचंड बहुमताने विजयी करतील असा विश्वास भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला. स्थानिक १८ प्रभाग मधील सोमठाणा परिसरात ते आयोजित जनतेची संवाद बैठकी ते बोलत होते. यावेळी त्यांनी दिलीप मिश्रा ,कविता देशमुख ,अमोल गोगे , सरिता कांबळे यांना विजयी करण्याचे आवाहन करून भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस सरकार महानगरपालिकेची स्थापना होणारच असा विश्वास व्यक्त केला यावेळी या भागातील विकासासाठी आपण सदैव तत्पर राहून या भागामध्ये किडा क्षेत्रासाठी अनेक सुविधा उपलब्ध होणार आहे आंतरराष्ट्रीय सुविधा या प्रभागामध्ये होणार आहे.

# मलकापूर प्रभाग 14 मध्ये 'मशाल' धगधगली !



प्रतिनिधी ९ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असून, मलकापूर या प्रभाग क्रमांक १४ मध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने मोठी मुसंडी मारली आहे. मलकापूर येथील पिल कॉलनी भागात झालेल्या कोपरा बैठकीत नागरिकांनी माजी नगरसेवक मंगेश काळे यांच्या कार्याचे कौतुक करत, आगामी निवडणुकीत त्यांना विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

मलकापूर प्रभाग १४ मधील पिल कॉलनी आणि दुर्गा माता मंदिर परिसरात काल संध्याकाळी कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत केवळ राजकीय चर्चाच झाली नाही, तर नागरिकांनी मंगेश काळे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांचा पाढाच वाचला. कोरोनासारख्या महाभयंकर संकटात जेव्हा सर्वजण घरात होते, तेव्हा मंगेश काळे यांनी स्वखर्चाने घरोघरी अन्नधान्य पोहोचवले, ही आठवण सांगताना अनेक नागरिक भावूक झाले होते. मलकापूर परिसरातील पाण्याचा प्रश्न हा नेहमीच कळीचा मुद्दा राहिला आहे. उन्हाळ्यात जेव्हा पाण्याची तीव्र टंचाई जाणवते, तेव्हा मंगेश काळे यांनी टँकरद्वारे घरोघरी पाणी पुरवून नागरिकांना मोठा दिलासा दिला होता. 'आमच्या हाकेला धावून येणारा लोकप्रतिनिधी' अशी त्यांची ओळख आता मलकापूर प्रभाग १४ मध्ये निर्माण झाली आहे. या निवडणुकीत शिवसेना (उबाठा) पक्षाकडून मंगेश काळे रिंगणात आहेत. या बैठकीत बोलताना मंगेश काळे यांनी विश्वास दिला की, येणाऱ्या काळात प्रभागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणे हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट असेल. नागरिकांचा मिळणारा हा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, प्रभाग १४ मध्ये 'मशाल' या चिन्हाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. विकासाच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या या पॅनेलने प्रचारात सध्या तरी आघाडी घेतल्याचे चित्र स्पष्ट आहे. प्रभाग १४ च्या विकासासाठी आणि नागरिकांच्या हक्कासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार सज्ज आहेत. पिल कॉलनी, मलकापूर येथील बैठकीत नागरिकांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद हा विजयाची नांदी आहे.

# प्रा.डॉ. कैलास नागूलकर यांच्या पुस्तकांचे विमोचन

प्रतिनिधी ९ जानेवारी




**अकोला :** नुकताच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अभ्यासक्रमावर आधारित व नविन धोरणाला अनुसरून, सेमिस्टर पध्दतीनुसार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापी गुलामनबी आझाद कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बार्शिटाकळी येथील व ग्रामीण विभअसलेले नॅकव्दारे अ दर्जा प्राप्त असलेल्या महाविद्यालयामध्ये नुकताच सेवानिवृत्ती व प्रकाशन सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ जनुनाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मधुकररावजी पवार, संस्थेचे उपाध्यक्ष, प्रमुख अतिथी व अमृतमहोत्सव सत्कार मूर्ती प्रल्हादराव पवार, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी.एस. खान, डॉ. संतोष हुशे व डॉ. अमित वैराळे तसेच सत्कारमुर्ती प्रा. डॉ. कैलास नागूलकर, प्र प्रा. किशोर आडोळे, एल.बी.राठोड, दत्तात्रय शास्त्री यांचा सेवानिवृत्ती सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. कैलास नागूलकर यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्र त्यांच्या बी.ए. भाग-१ प्राचिन भारताचा इतिहास व बि.ए. भाग-२ भारताचा स्वातंत्र्य आंदोलनाच दोन पुस्तकांचे विमोचन प्रकाशन करण्यात आले. ही पुस्तके म्हणजे राज्य व भारतातील सर्वच इतिहास विषयाच्या पदवीच्या विद्यार्थ्यांकरीता एक चांगली उपलब्धी असुन एम.पी.एस.सी.च्या स् सुध्दा उपयुक्त ठरणारी आहेत. प्रा.डॉ. कैलास नागूलकर एक जेष्ठ इतिहास संशोधक असुन एक विद्यार्थीप्रिय प्रा परिचित आहे. ते एक इतिहास अध्यापक, लेखक, मार्गदर्शक, संशोधक, व उत्कृष्ट व्याख्य गाडगे बाबा विद्यापीवा मध्ये चांगले सुपरिचित असून त्यांची स्वतःची ओळख आहे. त्यांनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय इतिहास परिषदामध्ये सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी व प्र मार्गदर्शनात आचार्य पदवींने एकुण ५ संशोधक विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा अमरावती आचार्य पदवी संशोधक विद्यार्थ्यांना बहाल झाली आहे. राज्य व राष्ट्रीय परिषदामध्ये ते रिस सतत सहभागी होवून मार्गदर्शन करतात. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, संशोधन व वि दखल घेवून अखिल भारतीय जिरेमाळी समाजाने त्यांना शेगांव येथे जानेवारी २०१८ मध्ये पुरस्कार' देवून गौरवोनत केले आहे. टोकियो येथील क्योटो विद्यापीठा मान्य करून स्वीकृत केले आहे. तसेच दरवर्षी १० वी, १२वी, पदवी व पदव्युत्तर स्पर्धा परीक्ष विद्यार्थ्यांना सतत मागदर्शन करीत असतात. या कार्याला अनुसरून आकोट येथे त्यांना डि राज्यस्तरीय सोहळ्यामध्ये 'शैक्षणिक कार्यगौरव पुरस्काराने 'सन्मानीत करण्यात आले.

# अकोल्याचे जवान वैभव लहाने यांना भाजपतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली

प्रतिनिधी ९ जानेवारी



**अकोला :** देशसेवेत कर्तव्य बजावत असताना अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांना वीरमरण आले. ते १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये कार्यरत होते. शहीद लहाने यांचे देशसेवा करताना निधन हे दुःखदायी असून त्यांचे कार्य सेवा अमर राहील लहाने परिवाराला दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर प्रदान करो अशी प्रार्थना करून खासदार अनुप धोत्रे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

शहिद लहाने हे जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत होते. दि. ७ जानेवारी २०२६ रोजी ते शहीद झाले. आपल्या मतदारसंघातील शहीद लहाने यांना आमदार रणधीर सावरकर यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. शहीद लहाने यांचे दुखद निधनाची बातमी ही वेदनादायी दुःखदायी असली तरी देश सेवेसाठी त्यांचे योगदान देश सेवेसाठी त्यांचे कार्य सदैव अमर राहील अशा शब्दात पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK